

# श्रीज्ञानेश्वरी
# अध्याय पंधरावा

या अध्यायाला पुरुषोत्तम योग असे नांव आहें. या अध्यायात प्रथम वृक्षरूपाने सृष्टीच्या पसाऱ्याचे किंवा परमेश्वराच्या नामरूमात्मक विस्ताराचेच वर्णन करून त्यातील बीज काय हें सांगून नंतर परमेश्वराच्या सर्व स्वरूपात श्रेष्ठ असे जें पुरुषोत्तमस्वरूप त्याचे वर्णन केले आहें म्हणून याला पुरुषोत्तम योग म्हणतात.

यात फक्त 20 श्लोक असून त्यावर 599 ओव्या आहेत. पहिल्या 9 ओव्यात श्रीनिवृत्तीनाथांची स्तुती असून त्यांचा कठीण ओव्यात अर्थ दिला आहें म्हणून त्यातील कठीण शब्दांचा अर्थ दिला नाही. पाचव्या श्लोकापर्यंत सृष्टीच्या पसाऱ्याचे वर्णन असून पुढे पुरुषोत्तम स्वरुपाचे वर्णन आहें .

यातील 86, 419, 468,470, या ओव्या दृष्टांताच्या दृष्टिने फार सुंदर आहे त. ओवी 115 आणि 116 या ओव्यात अश्वत्थ व पिंपळ एकच नाही हें स्पष्ट केले आहें

**श्रीज्ञानेश्वरी**
**अध्याय पंधरावा**

| | |
|---|---|
| आतां हृदय हें आपुले । चौफाळनियां [1] भले । | 1 चौरंग करून |
| वरी बैसऊ पाउले । श्रीगुरुंची ।।+1।। | |
| ऐक्यभावाची अंजुळी । सर्वेंद्रिय कुडमुळी [2]। | 2 उमलणारी कळी |
| भरुनिया पुष्पांजुळी । अर्ध्यु देवों ।।+2।। | |
| अनन्योदके धुवट । वासना जे तन्निष्ठ । | |
| तें लागलेसे अबोट [3] । चंदनाचे ।।+3।। | 3 अनामिका |
| प्रेमाचेनि भांगारे । निर्वाळूनि नुपुरे । | |
| लेवऊं सुकुमारे । पदें तियें ।।+4।। | |
| घणावली [4] आवडी । अव्यभिचारे चोखडी । | 4 दृढ झालेली |
| तिये घालूं जोडी । आंगोळिया ।।+5।। | |
| आनंदमोदबहळ । सात्विकाचे मुकुळ । | |
| तें उमलले अष्टदळ । ठेऊं वरी ।।+6।। | |
| तेथे अहं हा धूपु जाळुं । नाहं तेजें ओवाळूं । | |
| सामरस्यें पोटाळू । निरंतर ।।+7।। | |
| माझी तनु आणि प्राण । इया दोनी पाउवा लेऊं श्रीगुरुचरण । | |
| करूं भोगमोक्ष लिंबोण । पायां तयां ।।+8।। | |
| इया श्रीगुरुचरणसेवा । हों पात्र तया दैवा । | |
| जे सकळार्थमेळावा । पाटु बांधे [5] ।।+9।। | 5 सिंहासनावर अभिषेक करणे |
| ब्रह्मीचे विसवणेवरी [6] । उन्मेख [7]लाहे उजरी [8] । | 6 विश्रांतीस्थान 7 बुद्धी 8 उत्कर्ष |
| जे , वाचेते इयें करी । सुधासिंधु ।।10।। | |
| पूर्णचंद्राचिया कोडी । वक्तृत्वा घापे कुरोंडी । | |
| तैसी आणी गोडी । अक्षरांते ।।11।। | |
| सूर्ये अधिष्ठिली प्राची , । जगा राणीव [9] दे प्रकाशाची । | 9 राज्य |
| तैसी वाचा , श्रोतयां ज्ञानाची । दिवाळी करी ।।12।। | |
| नादब्रह्म खुजें , । कैवल्यही तैसे न सजे [10] , । | 10 शोभत नाही |
| ऐसा बोलु देखिजे । जेणे , दैवे ।।13।। | |
| श्रवणसुखाच्या मांडवी । विश्‍व भोगी माधवी । | |
| तैसी , सासिन्नली [11] बरवी , । वाचावल्ली ।।14।। | 11 भरास येतें |
| ठावो न पवता जयाचा , । मनेसी मुरडली [12] वाचा , । | 12 मनासहित मागे फिरली |
| तो देवो [13] होय शब्दाचा , । चमत्कारु ! ।।15।। | 13 परब्रह्म |
| जे ज्ञानासि न चोजवे [14] , । ध्यानासिही जे नागवे [15] , । | 14 जाणवत नाही 16 सापडत नाही |
| तें अगोचर [16] फावे । गोठीमाजी ।।16।। | 16 इंद्रियांना आकलन न होणारे |

येवढे एक सौभग [1] । वळघे [2] वाचेचे आंग ।
श्रीगुरुपादपद्मपराग । लाहे जै कां ! ।।17 ।।
तरी बहु बोलु काई ? । आजि ते आनी ठाई ।
मातेवाचूनि नाही । ज्ञानदेवो म्हणे ।।18।।
जे, तान्हेनि. मिया , अपत्ये । आणि, माझे गुरु एकलौतें [3] ।
म्हणौनि कृपेसि एकहाते [4] । जाले तिये ।।19।।
पाहा पां ! भरोवरी [5] आघवी , । मेघ ,चातकासी रिचवी , ।
मजलागी गोसावी ! । तैसे केले ।।20।।
म्हणौनि , रिकामे तोंड , । करुं गेले बडबड , ।
कीं , ’ गीता ’ ऐसे गोड , । आतुडले [6] ।।21।।
होय अदृष्ट आपैतें [7] , । तै , वाळुचि रत्ने परते [8] , ।
ऊजू [9] आयूष्य , तै , मारिते [10] । लोभु करी ।।22।।
आधणि घातलिया हरळ [11] , । होती अमृताचे तांदुळ , ।
जरी भुकेची राखे वेळ । श्रीजगन्नाथु ।।23।।
तयापरी , श्रीगुरु । करिती जै अंगीकारु , ।
तै , होऊनि ठाके संसारु । मोक्षमय , आघवा ।।24।।
पाहा पां , श्रीनारायणे , । तयां पांडवांचे उणे , ।
कींजेचि ना , पुराणे ! । विश्ववंद्ये !।।25।।
तैसे , श्रीनिवृत्तिराजे , । अज्ञानपण हें माझे , ।
आणिले वोजे [12] , । ज्ञानाचिये ।।26।।
परी हें असो ; आतां । प्रेम रुळतसे बोलतां , ।
के गुरुगौरव वर्णिता । उन्मेष [13] असे ! ।।27।।
आतां , तेणेचि पसाये [14] , । तुम्हां संताचे मी पाये ।।
वोळगेन [15] , अभिप्राये । गीतेचेनि ।।28।।
तरी तोचि प्रस्तुती । चौदाविया अध्यायाच्या अंती ।
निर्णयो कैवल्यपती । ऐसा केला , ।।29।।
जे ज्ञान जयाच्या हाती , । तोचि समर्थु मुक्ति ।
जैसा , शतमख [16] संपत्ती । स्वर्गीचिये ।।30।।
कां , शत एक जन्मा ।जो जन्मोनि , ब्रह्मकर्मा ।
करी , तोचि , ’’ ब्रह्मा ’’ । आनु [17] नोहे ! ।।31।।
नाना , सूर्याचा प्रकाशु । लाहे , जेवी डोळसु [18] , ।
तेवी , ज्ञानेचि सौरसु [19] । मोक्षाचा , तो ।।32।।
तरी तया ज्ञानालागी । कवणा पां , योग्यता आंगी ? ।
हें पाहता , जगी । देखिला एकु ।।33।।

1 भाग्य 2 आश्रय करणे
3 एकुलते एक
4 एकच मार्ग
5 भरुन ठेवलेले
6 सापडले 7 नशीब अनुकुल असले 8 रत्नाचे रूप घेते
9 सरळ 10 मृत्यु
11 खडे
12 योग्यतेचे
13 उत्साह
14 प्रसादाने
15 सेवा करीन
16 इंद्र
17 इतर काही
18 डोळस
19 ज्ञानानेच योग्यता लाभते

जे , पाताळीचेही निधान [1] । दावील कीर , अंजन । 1 धन
परी होआवे लोचन , । पायाळाचे [2] ।।34।। 2 पायाळू माणसाचे
तैसे , मोक्ष देईल ज्ञान , । येथे कीर नाही आन , ।
परी तेचि थारे [3] ,ऐसे मन । शुद्ध , होआवे ।।35।। 3 स्थीर होईल
तरी , विरक्तिवाचूनि कही । ज्ञानासि तगणेचि [4] नाही । 4 टीकाव नाही
हें , विचारुनि [5] , ठाई । ठेविले [6] देवे ।।36।। 5 विचार करून 6 निश्चित केले
आतां , विरक्तीची कवण परी ?। जे , येऊनि मनाते वरी , ।
हेही , सर्वज्ञे श्रीहरी । देखिले असे ।।37।।
जे विषे रांधिली रससोये , । जै , जेवणारा ठाउवी होये , ।
तै , तो ताटचि सांडूनि जाये । जयापरी ।।38।।
तैसी , संसारा या समस्ता , । जाणिजे जै अनित्यता , ।
तै , वैराग्य दवडिता ,। पाठी लागे ।।39।।
आतां , अनित्यत्व या कैसे ? । तेचि वृक्षाकारमिषे ।
सांगिजत असे विश्वेशे । पंचदशी ।।40।।
उपडिले कवतिके , । झाड येरी मोहरा ठाके [7] । 7 उलटून पडते
तें वेगे जैसे सुके , । तैसे हें नोहे ।।41।।
यांतें एकेपरी । रूपकाचिया कुसरी [8] । 8 चतुरपणे
सारीतसे वारी । संसाराची ।।42।।
करूनि संसार वावो [9] , । स्वरूपी अहंते ठावो [10] । 9 खोटा 10 स्वरूपी अहं
होआवया , अध्यावो । पंधरावा हा ।।43।। ब्रह्मास्मि हा भाव
आतां , हेचि आघवे । ग्रंथगर्भीचे चांगावे , । टिकवण्यासाठी
उपलविजेल, जीवे । आकर्णिजें ।।44।।
तरी , महानंद समुद्र ।जो ,पूर्ण पूर्णिमा चंद्र ।
तो , द्वारकेचा नरेंद्र , । ऐसे म्हणे ।।45।।
'' अगा पै , पंडुकुमरा ! । येतां स्वरूपाचिया घरा , ।
करीतसे आडवारा । विश्वाभासु जो , ।।46।।
तो हा जगडंबरु । नोहे ; येथ संसारु ।
हा जाणिजे महातरु । थांवला [11] असे ।।47।। 11 पसरलेला
परी , येरा रुखासारिखा । हा , तळी मुळे वरी शाखा , ।
तैसा नोहे , म्हणौनि, लेखा [12] । नयेचि कवणा ।।48।। 12 आवरता येत नाही
आगी , कां कुऱ्हाडी , । होय रिगावा जरी बुडी , ।
तरी , हो कां भलतेवढी । वरिचील वाढी , ।।49।।
जे तुटलिया मुळापाशी , । उलंडेल कां शाखांशी [13] , । 13 फांद्यासकट उन्मळून
परी तैशी गोठी कायशी ! । हा सोपा नव्हे ।।50।। पडतो

अर्जुना ! हें कवतिक । सांगतां , असे अलौकिक , ।
जे , वाढी अधोमुख ।रुखा यया ।।51।।
जैसा , भानू उंची नेणो के ?। रश्मिजाळ तळी फाके ।
संसार हे कावरुखे [1] । झाड तैसे ।।52।।
आणि आथी,नाथी,तितुके,। रुंधले [2] असे येणेचि एके ,।
कल्पांतीचेनि उदके , । व्योम जैसे ।।53।।
कां , रवीच्या अस्तमानी , ।आंधारेनि कोंदे रजनी , ।
तैसा , हाचि गगनी । मांडला असे ।।54।।
यया फळ ना , चुंबितां [3] , । फूल ना , तुरंबितां [4] , ।
जे काही , पंडुसुता ! । ते , रुखुचि हा ।।55।।
हा उर्ध्वमूळ आहें , । परी , उन्मूळिला नोहे , ।
येणेचि हा होये । शाङ्वळु [5] गा ! ।।56।।
आणि उर्ध्वमूळ ऐसे । निगदिले [6] कीर असे , ।
परी , अधीही [7] असोसे [8] । मूळे ययां ।।57।।
प्रबळला चौमेरी [9] । पिंपळा कां वडाचिया परी ।
जे पारंबियामाझारी । डहाळिया असती ।।58।।
तेवीचि गा धनंजया ! । संसारतरु यया , ।
अधीचि आथी खांदिया [10] , । हेही नाही ।।59।।
तरी उर्ध्वाहीकडे । शाखांचे मांदोडे [11] ।
दिसताति अपाडे । सासिन्नले [12] ।।60।।
जाले गगनचि पां वेलिया,। कां वारा मांडला रुखाचेनि आये [13] ।
नाना अवस्थात्रये । उदयला असे ।।+61।।
ऐसा हा एकु । विश्वाकार विटंकु [14] ।
उदयला जाण रुखु । ऊध्वमूळु ।।62।।
आतां ऊर्ध्व या कवण ? । येथे मूळ ते किं लक्षण ? ।
कां , अधोमुखपण । शाखा कैसिया ? ।।63।।
अथवा , द्रुमा यया । अधीं जिया मुळिया ।
तिया कोण कैसिया । ऊर्ध्व शाखा ? ।।64।।
आणि अश्वत्थु हा ऐसी । प्रसिद्धि कायसी ? ।
आत्मविदविलासी [15] । निर्णयो केला ।।65।।
हें आघवेचि बरवे । तुझिये प्रतीतीसि फावे [16] ।
तैसेनि सांगो सोलिवे [17] । विन्यासे [18] गा ! ।।66।।
परी ऐके गा सुभगा ! । हा प्रसंगु असे तुजचि जोगा ।
कानचि करी हो सर्वांगा । हिये आथिलिया [19] ।।67।।

1 आश्चर्यकारक
2 व्यापले
3 चाखण्यासाठी 4 वास घेण्यासाठी
5 हिरवा
6 बोलतात
7 खालीही 8 पुष्कळ
9 चोहोकडून वाढलेल्या
10 खालिच फक्त फांद्या आहेत 11 समुदाय
12 विस्तारलेले
13 विस्ताराने
14 घनदाट
15 आत्मज्ञानी लोकांनी
16 अनुभवास येईल
17 स्पष्ट 18 विवेचनाने
19 अंतःकरणपूर्वक

ऐसे प्रेमरसे सुरफुरे [1] । बोलिले जंव यादववीरे , । 1 ओथंबलेले
तंव , अवधान अर्जुनाकारे । मूर्त जाले ।।68।।
देव निरुपती , ते थेकुले , । येवढे श्रोतेंपण फाकले ! ।
जैसे , आकाशा खेव [2] पसरिले । दाही दिशी ।।69।। 2 आलिंगनाकरता
श्रीकृष्णोक्तिसागरा । हा अगस्तीचि दुसरा ! ।
म्हणौनि,घोटु भरो पाहे एकसरा [3] । अवघेयाचा ।।70।। 3 एकदम
ऐसी,सोय [4] सांडूनि खवळिली। आवडी अर्जुनी; देवे देखिली,। 4 मर्यादा
तेंथ , जालेनि सुखे , केली । कुरवंडी [5] , तया ।।71।। 5 ओवाळून टाकणे

**श्रीभगवानुवाच**

**ऊर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।**
**छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ।।1।।**

**श्रीभगवान म्हणाले - मूळ एक वर, व शाखा अनेक खाली असून, जो अव्यय म्हणजे कधीही नाश न पावणारा, छंदांसि म्हणजे वेद ही ज्याची पाने, असे ज्या अश्वत्थ वृक्षाचे वर्णन करितात, तो वृक्ष ज्याने जाणितला तो पुरुष खरा वेदवेत्ता होय.**

मग म्हणे धनंजया ! । ते [6] ऊर्ध्व गा तरु यया । 6 परब्रह्म
येणे रुखेचि कां जयां [7] । ऊर्ध्वता गमे ।।72।। 7 परब्रह्माला
एऱ्हवी , मध्योर्ध्व , अध । हे नाही जेथ भेद , ।
अद्वयासी एकवद [8] । जया ठायी ।।73।। 8 ऐक्य
जो , नाइकिजता नादु , । जो , असौरभ्य [9] मकरंदु ,। 9 वास घेता येत नाही असा
जो, आंगाथिला [10] ,आनंदु ,। सुरतेविण [11] ।।+74।। 10 स्वयमेव 11 मैथूनाशिवाय
जया जे आऱ्हा [12] , परौते [13] , । जया जे पुढे मागौते , । 12 अलिकडे
दिसतेनविण दिसते । अदृश्य जे ।।+75।। 13 पलिकडे
उपाधीचा दुसरा । घालिता वोपसरा [14] । 14 संबंध
नामरुपाचा संसारा [15] । होय जयाते ।।+76।। 15 व्यवहार
ज्ञातृज्ञेयाविहीन [16] । नुसधेचि जे ज्ञान । 16 जाणण्याचा व जाणणारा
सुखा भरले गगन । गाळीव [17] जे ।।77।। विषय या विरहित
जे कार्य ना कारण , । जया दुजे ना एकपण , । 17 शुद्ध
आपणयां जे जाण , । आपणचि ।।78।।
ऐसे वस्तु जे साचें । ते , ऊर्ध्व गा यया तरुचे ।
तेंथ आर [18] घेणे मूळाचे । ते ऐसे असे ।।79।। 18 अंकूर
तरी , माया ऐसी ख्याती । नसतीच , यया आथी , ।
कां , वांझेची संतती । वानणे , जैशी ।।80।।

| | |
|---|---|
| तैसी , सत, ना असत् होये , । जे , विचाराचे नाम न साहे , । | |
| ऐसेया परीची आहें , । अनादि म्हणती ।।81।। | |
| जे , नानातत्वांची मांदुस [1] । जें जगदभ्रमाचे आकाश । | 1 पेटी |
| जे आकारजाताचे दुस [2] । घडी केले ।।82।। | 2 वस्त्र |
| जे भवद्रुमबीजिका , । जे प्रपचंचित्र भूमिका , । | |
| विपरीत ज्ञानदीपिका । सांचली [3] जे ।।83।। | 3 प्रज्वलीत झाली |
| तें माया वस्तुच्या ठायी । असे , जैसेनि नाही । | |
| मग , वस्तुप्रभाचि पाही । प्रगट होये ।।84।। | |
| जेव्हा आपणया आली निद , । करी आपणपें जेवी मुग्ध , । | |
| कां , काजळी आणि [4] मंद । प्रभा , दीपी ।।85।। | 4 आणते |
| **स्वप्नी , प्रियापुढे तरुणांगी । निदेली , चेववूनि , वेगी ।** | |
| **आलिगिलेनिवीण आलिंगी , । सकामु करी ।।86।।** | |
| तेसी , स्वरुपी जाली माया , । आणि स्वरुप नेणे [5] धनंजया ! । | 5 ओळखत नाही |
| तेचि रुखा यया । मूळ पहिले ।।87।। | |
| वस्तुसी आपुला जो अबोधु , । तो ऊर्ध्वी आठुळैजें [6] कंदु । | 6 बांधतो |
| वेदांती हाचि प्रसिद्धु । ' बीजभावो ' ।।88।। | |
| घन अज्ञान [7] , सुषुप्ती [8] । तो ' बीजांकुरभावो ' म्हणती, । | 7 गाढे अज्ञान 8 दाट |
| येर , स्वप्न हन जागृती , । हा ' फळभावो ' तियेचा ।।89।। | निद्रा |
| ऐसी यया वेदांती । निरुपणभाषाप्रतीती [9] । | 9 प्रसिध्दी |
| परी तें असो; प्रस्तुती । अज्ञान मूळ ।।90।। | |
| तें , ऊर्ध्व आत्मा निर्मळे , । अधोर्ध्व सूचिती [10] मुळे । | 10 दाखवितात |
| बळिया बांधोनि आळे । मायायोगाचे ।।91।। | |
| मग आधिली [11] सदेहांतरी । उठती जिये अपारे । | 11 खालची |
| तें चौपासी [12] घेऊनि आगारे [13] । खोलावती [14]।।92।। | 12 चहुकडे 13 अंकुर |
| ऐसे भवद्रुमाचे मूळ , । ये ऊर्ध्व करी बळ । | 14 खोल जातात |
| मग आणियांचे बेचळ [15] । अधी [16]दावी ।।93।। | 15 बारीक टोकांचे झुबके |
| तेंथ चिद्वृत्ती [17] पहिले । महत्तत्त्व उमलले । | 16 खोल 17 मायेपासून |
| तें पान वाल्हेदुल्हे [18] । एक निघे ।।94।। | 18 नवीन लुसलुशीत |
| मग सत्त्वरजतमात्मकु । त्रिविध अहंकारु जो एकु । | |
| तो तिवणा [19] अधोमुखु । डिरु [20]फुटे ।।95।। | 19 तीन पानांचा |
| तो बुद्धीची घेऊनि आगारी [21] । भेदाची वृद्धी करी । | 20 अंकुर 21 डहाळी |
| तेंथ मनाचे डाळ [22] धरी । साजेंपणे [23] ।।96।। | 22 फांदी 23 टवटवीतपणे |
| ऐसा , मुळाचिया गाढिका [24] , । विकल्परस कोवळिका , । | 24 बळाने |
| चित्तचतुष्टय डाहाळिका । कौंभैजें [25] तो ।।97।। | 25 अंकुर घेतो |

| | |
|---|---|
| मग आकाश वायु द्योतक [1] । आप , पृथ्वी हें पांच फोक । | 1 तेज |
| महाभूतांचे सरोख [2] । सरळे होती ।।98।। | 2 जोराने |
| तैसी , श्रोत्रादि तन्मात्रे । तिये अंगवसां [3] , गर्भपत्रे [4] । | 3 शेंडीला 4 कोवळे पान |
| लुळलुळितें [5] विचित्रे । उमळती गा ! ।।99।। | 5 लुसलुशीत |
| तेंथ शब्दांकुर वरिपडी [6] । श्रोत्रा वाढी देव्हडी [7] । | 6 प्राप्त होते 7 पुष्कळ |
| होता , करित कांडी । आकांक्षेची ।।100।। | |
| अंगत्वचेचे वेलपल्लव । स्पर्शांकुर [8] घेती धांव । | 8 स्पर्श ज्ञानाचे अंकुर |
| तेथ , बांबळ [9] पडे अभिनव [10] । विकारांचे ।।101।। | 9 अधिक्य 10 अपूर्व |
| पाठी रूपपत्र पालोवेली [11] । चक्षु,लांब,ते,कांडे [12] घाली । | 11 रूपरुपी पानांची दाटी |
| ते वेळी , व्यामोहता [13] भली । पाहाळी [14] जाय ।।102।। | 12 चक्षुरुपी लांब पेरे 13 भ्रम |
| आणि ,रसाचे आंगवसे [15] , । वाढता वेगे बहुवसे , । | 14 विस्तार 15 अंगाच्या विस्ताराने |
| जिव्हे , आर्तीची असोसे [16] । निघती बेंचे [17] ।।103।। | 16 पुष्कळ 17 पानाला फुटलले पान |
| तैसेचि,कोंभलेनि [18] गंधे,। घ्राणाची डिरी [19] थांवु बांधे [20] । | 18 अंकुर 19 शेंडा |
| तेंथ तळु[21], घे स्वानंदे । प्रलोभाचा [22] ।। 104।। | 20 जोर पावते |
| एवं , महदहंबुद्धि [23] । मने महाभूतसमृद्धी । | 21 तळाशी 22 अतीशय लोभ |
| इये संसाराचिया अवधी [24] । सासनिजें [25] ।।105।। | 23 महत्तत्त्व,अहंकार व बुद्धि |
| किंबहुना , इही आठे [26] । आंगी , हा अधिक फाटे । | 24 मर्यादा 25 भरास येते |
| परी , शिंपीचियेवढे उमटे । रुपे जेवी , ।।106।। | 26 महत्तत्त्वादिक आठ भाव |
| कां , समुद्राचेनि पैसारे [27] ,। वरी तरंगता आसारे [28] । | 27 विस्तार 28 पसरतात |
| तैसे , ब्रह्मचि होय वृक्षाकारे , । अज्ञानमुळ ।।107।। | |
| आतां , याचा हाचि विस्तारु । हाचि यया पैसारु । | |
| जैसा , आपणपें स्वप्नी परिवारु । येकाकिया ।।108।। | |
| परी ते असो ; हें ऐसे । कावरे [29] झाड उससे [30] । | 29 भ्रमात्मक 30 उत्पन्न होतें |
| यया महदादि आरवसे [31] । अधोशाखा ।।109।। | 31 अंकुर |
| आणि '' अश्वत्थु '' ऐसे ययातें । म्हणती जे जाणतें , । | |
| तेही परिस हो येथे । सांगिजैल ।।110।। | |
| तरी श्वः म्हणिजें उखा [32] , । तोवरी एकसारिखा । | 32 पहाट |
| नाही निर्वाहो यया रुखा , । प्रपंचरूपा ।।111।। | |
| जैसा न लोटता क्षणु , । मेघु होय नाना वर्णु , । | |
| कां , विजु नसे संपुर्णु । निमेषभरी ।।112।। | |
| ना,कांपतया पद्मदळा [33]। वरीलिया, बैसका [34] नाही जळा । | 33 थरथरणाऱ्या कमळाचे |
| कां , चित्त जैसे व्याकुळा । माणुसाचे ।।113।। | पानावर 34 स्थीर होत नाही |
| तैसीचि ययाची स्थिती । नासत जाय क्षणक्षणाप्रती । | |
| म्हणौनि , ययातें म्हणती । '' अश्वत्थु '' हा ।।114।। | |

आणि '' अश्वत्थु '' येणे नांवे । पिंपळु म्हणती स्वभावे ।
परी तो अभिप्राय नोहे । श्रीहरीचा ।।115।।
एऱ्हवी पिंपळु म्हणता विखी [1]।मिया गति [2] देखिली असे निकीं [3] । 1 विषयी 2 अर्थ 3 चांगली
परी ते असो ; काय लोकिकीं । हेतु काज ? ।।116।।
म्हणौनि , हा प्रस्तुतु । अलोकिकु परियेसा ग्रंथु [4] । 4 व्याख्यान
तरी क्षणिकत्वेंचि अश्वत्थु । बोलिजें हा ।।117।।
आणिकुही येकु थोरु , । यया अव्ययत्वाचा डगरु [5] । 5 अविनाशपणाची
आथी , परी तो भीतरु [6] । ऐसा आहें ।।118।। प्रसिद्धी 6 गर्भित
जैसा , मेघांचेनि तोंडे । सिंधु एके आंगे काढे , ।
आणि , नदी येरीकडे । भरितीच असती ।।119।।
तेंथ वोहटे ना चढे , । ऐसा परिपूर्णुचि आवडे ।
परी , तें फुली [7] जंव नुघडे [8] । मेघानदीची ।।120।। 7 संयोग 8 घडत नाही
ऐसे या रुखाचे होणे जाणे । न तर्के होतेनि [9] वहिलेपणे [10] । 9 तर्काने समजत नाही
म्हणौनि , ययातें लोकु म्हणे । '' अव्ययु हा '' ।।121।। 10 वाहण्याचा वेग
एऱ्हवी दानशीळु पुरुषु । वेचकपणेचि संचकु [11] । 11 खर्चकरूनही संचय
तैसा , व्ययेचि हा रुखु । अव्ययो गमे ।।122।। करणारा असतो
जातां वेगे बहुवसे [12] , । न , वचे [13], कां भूमी रुतले असे , । 12 खूप 13 फिरते
रथाचे चक्र दिसे । जियापरी ।।123।। आहे
तैसे , काळातिक्रमे जे वाळे , । ते भूतशाखा जेथ गळे , ।
तेंथ , कोडीवरी उमाळे [14] । उठती आणीक ।।124।। 14 पुंजके
परी येकीं केधवां गेली , । शाखाकोडी केधवां जाली ।
हें नेणवे , जेवी उमलली । आषाढअभ्रे ।।125।।
महाकल्पाच्या शेवटी । उदेलिया , उमळती [15] सृष्टी । 15 नष्ट होतात
तेसेचि , आणिखीचे दांग [16] उठी । सासिन्नले [17] ।।126।। 16 अरण्ये 17 बहरले
संहारवाते प्रचंडे । पडती प्रळयांतीची सालडे [18] । 18 साली
तंव कल्पादीची जुंबाडे [19] । पाल्हेजती [20] ।। 127।। 19 घोस 20 उत्पन्न
रिगे मन्वंतर मनुपुढे , । वंशावरी वंशांचे मांडे [21] । होतात 21 विस्तार होतो
जैसी , इक्षुवृद्धी कांडेनकांडे । जिंके जेवी ।।128।।
कलियुगांती , कोरडी । चहूयुगांची साले सांडी , ।
तवं कृतयुगाचे पेली देव्हडी [22] । पडे पुढती ।।129।। 22 दुप्पट ओली ताजी
वर्तते वर्ष जाये , । ते पुढिला मुळहारी [23] होये । साले 23 बोलवणारे
जैसा , दिवसु जात कीं येत आहें । हें चोजवेना ।।130।।
जैसा , वारियाचा झुळका , । सांदा ठाउवा नव्हे देखा , ।।
तैसिया , उठी पडती शाखा । नेणो किती ! ।।131।।

एकी देहाची  डिरी तुटे , । तवं , देहांकुरी बहुवी [1] फुटे । 1 पुष्कळ
ऐसेनि भवतरु हा वाटे । अव्ययो ऐसा ।।132।।
जैसे , वाहतें पाणी जाय वेगे , ।तैसेचि , आणिक मिळे मागे ।
येथ असंतचि [2] असिजे , जगे । मानिजे संत [3] ।।133।। 2 नाशवंत 3 अविनाशी
कां , लागोनि डोळा उघडे ,। तंव , कोडीवरी घडे मोडे ,।
नेणतया [4] , तरंगु आवडे [4] । नित्यु ऐसा ।।134।। 4 अज्ञानी माणसाला
वायसा एके बुबुळे , दोहीकडे । डोळा चाळितां अपाडे [6] ,। 5 भासतो 6 वेगाने
दोन्ही आथी [7] , ऐसा पडे । भ्रमु जेवी जगा ।।135।। 7 आहेत
पै , भिंगोरी निधीये पडली , । ते गमे , भूमीसी जैसी जडली , ।
ऐसा , वेगातिशयो , भुली । हेंतु होय ।।136।।
हें बहु असो , झडती [8] । आंधारे भोवंडिता कोलती [9] , । 8 झटकन 9 पेटलेले लाकुड
तें दिसे जेसी , आयती [10] । चक्राकार ।।137।। गरगर फिरवले असता
हा संसारवृक्षु तैसा । मोडतु मांडतु , सहसा [11] । 10 पूर्ण 11 एकदम
न  देखोनि , लोकु पिसा [12] । अव्ययो मानी ।।138।। 12  भ्रमलेपणाने
परी ययाचा वेगु देखे । जो , हा क्षणिक ऐसा वोळखे ।
जाणे , कोडीवेळां निमिखे । होत जात ।।139।।
नाही अज्ञानावाचूंनि मूळ , । ययाचे असिलेपण, टवाळ [13] । 13 खोटे
ऐसे झाडचि सिनसाळ [14] । देखिले जेंणे , ।।140।। 14 जीर्ण सालीचे
तयातें गा पंडुसुता ! । मी सर्वज्ञुही म्हणे  '' जाणता '' ।
पै , वाग्ब्रह्म सिद्धांता [15]। वंद्यु तोची ।।141।। 15 वेदांतातील सिध्दांत
योगजाताचे जोडले । तया एकासीचि उपेगा गेले ।
किंबहुना , जियाले । ज्ञानही त्याचेनी ।।142।।
हें असो बहु बोलणे ;  । वानिजैल तो कवणे ।
जो , भवरुखु जाणे । उखि [16] ऐसा ।।143।। 16 अनित्य

**अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा गुणप्रवृद्धा विषयप्रवाला ः ।**
**अधश्च मूलान्यनुसंततानि कार्मानुबंधीनि मनुष्यलोके ।।2।।**

**सत्त्वादि तीन गुणांनी पोसलेल्या आणि ज्यापासून शब्द,स्पर्श,रुप, रस व गंधरुपी विषयांचे अंकुर फुटलेले आहे त, अशा त्याच्या शाखा खाली आणि वरहि पसरलेल्या आहें त; आणि अखेर कर्माचे रूप पावणाऱ्या त्याच्या मुळ्या खालीहि मनुष्यलोकात वाढत  गेल्या आहें त.**

मग ययाचि प्रपंचरूपा । अधोशाखिया पादपा [17] । 17 झाडाला
डाहाळिया जाती उमपा [18] । ऊर्ध्वाही उजु ।।  144।। 18 अमर्याद

आणि अधीं [1] फांकली डाळे , । तिये होती मुळे ।
तयाही तळी पघळे । वेल पालवु ।।145।।
ऐसे जें आम्ही । म्हणितले उपक्रमी [2] ।
तेही परिसे सुगमी [3] । बोली सांगो ।।146।।
तरी बद्धमुळ अज्ञाने , । महदादिकीं सासिने [4] ।
वेदांची थोरवने, । घेऊनियां ।।147।।
परी आधी तंव स्वेदज , । जारज , उद्भिज , अंडज , ।
हें बुडौनि महाभुज । उठती चारी ।।148।।
यया एकैकाचेनि आंगवटे [5]। चौऱ्यांशी लक्षधा फुटे ।
तें वेळी जीवशाखी फांटे [6] । सैंधचि होती ।।149।।
प्रसवती शाखा सरळिया । नानासृष्टि डाहाळिया ।
आड फुटती माळिया [7] । जातिचिया ।।150।।
स्त्री ,पुरुष , नपुसकें । हें व्यक्तिभेदांचे टके [8] ।
आंदोळती आंगिके । विकारभारे ।।151।।
जैसा , वर्षाकाळु गगनी । पाल्हेजें नवघनी [9] ।
तैसे , आकारजात अज्ञानी । वेली जाय ।।152।।
मग शाखांचेनि आंगभारे , । लवोनि गुंफिती परस्परे ।
गुणक्षोभाचे वारे । उदयजती ।।153।।
तेंथ तेणे अचाटे । गुणाचेनि झडझडाटे [10] ।
तिही ठायी हा फांटे [11] । ऊर्ध्वमूळ ।।154।।
ऐसा रजाचिया झुळुका । झडाडितां आगळिका [12] ।
मनुष्यजाती शाखा । थोरावती ।।155।।
तिया ऊर्ध्वी ना अधीं , । माझारिची कोंदाकोंदी , ।
आड फुटती खांदी ।चतुर्वर्णाच्या ।।156।।
तेंथ विधिनिषेध सपल्लव । वेदवाक्यांचे अभिनव ।
पालव डोलती बरव । नीच नवे ।।157।।
अर्थु कामु पसरे । अग्रवने [13] घेती थारे [14] ।
तेंथ क्षणिके पदांतरे [15] । इहभोगाची ।।158।।
तेंथ प्रवृत्तीचेनि वृद्धिलोभे , । खांकरेजती[16] शुभाशुभे ।
नानाकर्मांचे खांबे [17] । नेणो किती ! ।।159।।
तेवीचि भोगक्षीणे , मागिले । पडती देहांतीची बुडसळे [18] ।
तंव पुढां वाढी पेले [19] । नवेया देहांची ।।160।।
आणि शब्दादिक सुहावें [20] । सहज रंगे हवावे [21] ।
विषयपल्लव नवे । नित्य होती ।।161।।

1 खाली
2 आरंभी
3 सोप्या
4 महत्तत्वाच्या भराने
5 आंगातून
6 विस्तार
7 आडव्या फांद्या
8 घोस
9 नवीन मेघांचा विस्तार होतो
10 वाऱ्याच्या वेगाने
11 वाढतो
1 2 वाऱ्याच्या वाढीने
13 अंकुर 14 आश्रय
15 दुसरी जागा
16 फुटतात
17 सोट
18 शुष्क काष्ट
19 तयार होतें
20 सुशोभित
21 शोभिवंत

ऐसे रजोवातें प्रचंडे । मनुष्यशाखांचे मांदोडे [1] । — 1 फांद्यांचे झुबके
वाढती , तो एथ रूढे । मनुष्यलोकु ।।162।।
तैसाचि तो रजाचा वारा , । नावेक [2] धरी वोसरा [3] । — 2 क्षणभर 3 कमी होतो
मग वाजो लागे घोरा [4] । तमाचा तो ।।163।। — 4 भयंकर
तेंधवां याचिया मनुष्यशाखा,। नीच वासना अधी [5] देखा । — 5 खाली
पाल्हेजती [6] डाहाळिका । कुकर्माचिया ।।164।। — 6 वाढतात
अप्रवृत्तीचे खणुवाळे [7] । कोंभ निघती सरळे । — 7 खडबडीत
घेत पान , पालव , डाळे । प्रमादाची ।।165।।
बोलती निषेधनियमे । जिया ऋचा यजुःसामे , ।
तो पाला तया घुमे [8]। टकेयावरी [9] ।।166।। — 8 दुमदुमणे 9 टोकापर्यंत
प्रतिपादती अभिचार [10] । आगम जे परमार [11] । — 10 जारण मारण विद्या
तिही पानी घेती प्रसर । वासना वेली ।।167।। — 11 अथर्ववेदातील परपीडा देणारे
तंव , तंव होती थोराडे । अकर्माची [12] तळबुडे ।।168।। — मंत्र 12 निषिद्ध कर्माची
आणि जन्मशाखा पुढे पुढे । घेती धांव ।।169।।
तेंथ चांडाळादि निकृष्टा , । दोषजातीचा थोर फांटा ।
जाळ पडे [13] कर्मभ्रष्टां । भुलोनिया ।। 169।। — 13 जाळ्यात अडकतात
पशु , पक्षी , सूकर [14] ।व्याघ्र , वृश्चिक , विखार [15] । — 14 डुक्कर 15 साप
हें आडशाखा प्रकार । पैसु [16] घेती ।। 170।। — 16 विस्तार
परी ऐशा शाखा पांडवा ! । सर्वांगीही नित्य नवा ।
निरयभोग [17] यावा । फळाचा तो ।।171।। — 17 नरकयातना
आणि हिंसाविषयपुढारी [18]। कुकर्मसंगे धुर धरी [19] । — 18 मुख्यतः हिंसाविषय
जन्मवरी आगारी [20]। वाढतीचि असे ।।172।। — 19 अग्रभागी असते 20 अंकुर
ऐसे होती तरु , तृण , । लोह , लोष्ट [21] , पाषाण । — 21 मातीचे ढेकुळ
इया खांदिया तेवीं जाण । फळेही हेचीं ।।173।।
अर्जुना गा ! अवधारी । मनुष्यालागोनि इयापरी ।
वृद्धि स्थावरांतवरी । अधोशाखांची ।। 174।।
म्हणौनि , जी मनुष्यडाळे , । तिये जाणावी अधींचि मुळे [23], । — 23 खालची मुळे
जें , एथूनि हा पघळे । संसारतरु ।।175।।
एऱ्हवी , ऊर्ध्वीचे पार्था ! । मुद्दल मूळ पाहतां , ।
अधींचिया मध्यस्था [24] । शाखा इया ।।176।। — 24 मधल्या
परी तामसी , सात्विकीं । सुकृतदुष्कृतात्मकीं ।
विरूढती या शाखी । अधोर्ध्वीचिया ।।177।।
आणि वेदत्रयाचिया पाना । नये अन्यत्र लागो [25] अर्जुना ! । — 25 आवड
जे , मनुष्यावाचूनि विधाना [26] । विषय नाही ।।178।। — 26 संबंध

म्हणौनि , तनु मानुषा । इया , ऊर्ध्वमूळौनि जरी शाखा , ।
तरी , कर्मवृद्धीसि देखा । इयेचि मूळे ।।179।।
आणि , आनी तरी झाडी , । शाखा वाढतां , मूळे गाढी , ।
मूळ गाढे , तंव वाढी । पैस [1] आथी ।।180।।     1 भरपूर
तैसेचि , इया शरीरा , । कर्म तंव , देहा संसारा , ।
आणि , देह तंव व्यापारा । ना म्हणोचि नये ।।181।।
म्हणौनि , देहे मानुषे । इये मूळे होती न चुके ।
ऐसे जगज्जनके । बोलिले तेंणे ।।182।।
मग तमाचे ते दारुण । स्थिरावलेया वाउधाण [2] ।     2 वादळ
सत्त्वाची सुटे सत्राण [3] । वाहुटळी [4] ।।183।।     3 भयंकर जोराने 4 वावटळ
तै,याचि मनष्याकारा । मूळी,सुवासना निघती,आरा [5] ।     5 अंकुर
घेऊनि फुटती कोंबारा [6] । सुकृतांकुरी ।।184।।     6 झुबके
उकलतेनि उन्मेखे [7] ,। प्रज्ञाकुशलतेची तिखे ।     7 ज्ञानप्रकाशाने
डिरिया निघती निमिखे [8] । बाबळेजुनी [9] ।।185।।     8 क्षणात 9 विस्तार पावतात
मतीचे सोट वांवे । घालिती [10] , स्फूर्तीचेनि थावे [11] ।     10 विस्तारतात 11 बळाने
बुद्धि प्रकाश घे धांवे । विवेकावरी ।।186।।
तेंथ , मेधारसे सगर्भ । अस्थापत्री सबोंब [12] ।     12 सुशोभित
सरळ निघती कोंभ । सद्वृत्तीचे ।।187।।
सदाचाराचिया सहसा [13] । टका उठती [14] बहुवसा [15] ।     13 एकदम 14 घोस 15 खूप
घुमघुमिती घोषा । वेदपद्याच्या ।।188।।     16 शिष्टाचार व वेदोक्त
शिष्टागमविधाने [16] । विविधयागविताने [17] ।     आचरण 17 नाना प्रकारच्या
इये पानावरी पाने । पालेजती ।।189।।     योग क्रियांचा विस्तार
ऐशा,यमदमी घोसाळिया [18] । उठति तपाचिया डाहाळिया ।     18 घोस असलेल्या
देती वैराग्यशाखा कोवळिया । वेल्हालपणे [19] ।।190।।     19 विस्ताराने
विशिष्टां व्रतांचे फोक , । धीराच्या अणगटी [20] तीख , ।     20 अंकुर
जन्मवेगे ऊर्ध्वमुख । उंचावती ।।191।।
माजी वेदांचा पाला दाट । तो करी सुविद्येचा झडझडाट ।
जंव वाजें अचाट । सत्त्वानिळु [21] तो ।।192।।     21 सत्त्वगुणरूपी वारा
तेंथ धर्मडाळ बाहाळी [22] । दिसती जन्मशाखा सरळी ।     22 विस्तार पावतात
तिया आड फुटती फळी । स्वर्गादिकीं ।।193।।
पुढां , उपरति रागे लोहिवी [23] । धर्ममोक्षाची शाखा पालवी ।     23 वैराग्याचा तांबडा रंग
पाल्हाजत [24] नित्य नवी । वाढतीचि असे ।।194।।     24 वाढताता
पै , रविचंद्रादि ग्रहवर , । पितृ , ऋषि , विद्याधर ।
हें आडशाखा प्रकार ।पैसु घेती ।।195।।

याहीपासून उंचवडे , । गुढले[1] फळाचेनि बुडे ।          1 व्याप्त झालेले
इंद्रादिक तें मांदोडे[2]। थोर शाखांचे ।।196।।          2 घोस
मग तयांही उपरी डाहाळिया । तपोज्ञानी उंचावलिया ।
मरीचि , कश्यपादि इया । उपरी शाखा ।।197।।
एवं , माळोवाळी[3] उत्तरोत्तरु , । ऊर्ध्वशाखांचा पैसारु ।          3 चोहोकडून शाखोपशाखी
बुडी साना , अग्री थोरु । फळाढ्यपणे ।।198।।
वरी , उपरीशाखाही पाठी । येती फळभार जे , किरीटी ! ।
ते ब्रह्मेशांत अणगटी[4] । कोंभ निघती ।।199।।          4 अणकुचीदार टोक असलेले
फळाचेनि वोझेपणे । ऊर्ध्वी वोवांडे[5] दुणे ।।          5 खाली येतें
जंव माघौतें बैसणे । मूळीचि होय ।।200।।
प्राकृताही[6] तरी रुखा , । जें फळे दाटली होय शाखा , ।          6 सामान्यपणे
तें वोवांडली देखा । बुडासि ये ।।201।।
तैसे , जेंथूनि हा आघवा । संसारतरुचा उठावा , ।
तिये मूळी टेकती पांडवा ! । वाढतेनि ज्ञाने ।।202।।
म्हणौनि , ब्रह्मेशानापरौते । वाढणे नाही जीवाते ।
तेंथूनि मग वरौते[7] । ब्रह्मचि कीं ! ।।203।।          7 वर
परी हे असो ; ऐसे । ब्रह्मादिक ते आंगवसे[8] ।          8 स्वरूपतः
ऊर्ध्वमूळासरिसे । न तुकती गा ! ।।204।।
आणीकही शाखा उपरता,। जिया सनकादिक नामी विख्याता,।
तिया , फळी मूळी नाडळता[9] , । भरलिया ब्रह्मी ।।205।।          9 न अडकता
ऐसी , मनुष्यापासूनि जाणावी । ऊर्ध्वी ब्रह्मादिशेष पालवी ।
शाखांची वाढी बरवी । उंचावे पै ।।206।।
पार्था ! ऊर्ध्वीचिया ब्रह्मादि , । मनुष्यत्वचि होय आदि ।
म्हणौनि , इये अधीं । म्हणितली मूळे ।।207।।
एवं , तुज अलौकिकु । हा अधोर्ध्वशाखु ।
सांगितला , भवरुखु । ऊर्ध्वमूळु ।।208।।
अधींची ही मूळे , । उपरती परिसविली सविवळे[10] ।          10 विस्तारपूर्वक
आतां परिस , उन्मुळे । कैसेनि हा ।।209।।

**न रुपमस्येह तथोपलभ्यतें नान्तो न चादिर्न च संप्रतिष्ठा ।**
**अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसङगशास्त्रेण दृढेन छित्त्वा ।।3।।**

**परंतु वर जसे वर्ण केले त्याप्रमाणे इहलोकीं याचे स्वरूप उपलब्ध होत नाही; किंवा अंत, आदि आणि आधारस्थानहि मिळत नाही. अत्यंत खोल गेलेल्या मुळ्यांचा हा अश्वत्थ वृक्ष अनासक्तिरूप बळकट तरवारीने तोडून टाकून**

परी ,तुझ्या हन पोटी । ऐसे गमेल किरीटी ! ।
जें , येवढे झाड उत्पाटी [1] ,। ऐसे कायि असे ? ।।210।। 1 उपडून टाकण्यास
कीं , ब्रह्मयाच्या शेवटवरी । ऊर्ध्व शाखांची थोरी , ।
आणि , मूळ तंव निराकारी । ऊर्ध्वी असे ।।211।।
हा स्थावराही [2] तळी । फाकत असे अधींच्या डाळी । 2 अचल
माजी , धांवतसे दुजा मुळी । मनुष्यरूपी ! ।।212।।
ऐसा गाढा आणि अफाटु , । आतां कोण करी यया शेवटु ? ।
तरी झणी [3] हा हळुवटु [4] । धरिसी भावो ।।213।। 3 नको 4 क्षुद्र
तरी हा उन्मुळावया दोषे [5] । येथ सायासचि कायिसे ? । 5 उद्देश
काय , बाळा, बागुल देशे [6] । दवडावा आहें ? ।।214।। 6 कोठेतरी
गंधर्वदुर्ग [7] कायी पाडावे ? । काय , शशविषाण मोडावे ? । 7 ढगांच्या आकृतीने
होआवे , मग तोडावे । खपुष्प कीं ? ।।215।। भासणारा किल्ला
तैसा , संसारु हा , वीरा ! । रुख नाही साचोकारा , ।
मा , उन्मूळणीं दरारा [8] । कायिसा तरी ? ।।216।. 8 भीती
आम्ही सांगितली जे परी [9] । मूळडाळांची उजरी [10] , । 9 प्रकार 10 उत्कर्ष
तें , वांझेची घरभरी । लेकुरें जैशी ।।217।।
काय कींजती चेइलेपणी [11] । स्वप्नीची तिये बोलणी ? । 11 जागेपणी
तैशी , जाण ते काहाणी । दुगळीचि [12] तें ।।218।। 12 पोकळ
वांचूनि,आम्ही निरूपिले जैसे,। ययाचे अचळ मूळ असे तैसे,।
आणि , तैसाचि जरी हा असे । साचोकारा , ।।219।।
तरी कोणाचेनि संताने । निपजती , तया उन्मुळणे ? ।
काय फुंकिलिया , गगने । जाइजेल गा ? ।।220।।
म्हणौनि , पै , धनंजया ! । आम्ही वानिले रूप , ते माया , ।
कासवीचेनि तुपे राया । वोगरिले जैसे ।।221।।
मृगजळाची गा तळी , । तिये , दिठी दुरूनि न्याहाळी , ।
वांचूनि , तेंणे पाणिये , साळी केळी । लाविसी काई ? ।।222।।
मूळ अज्ञानचि तंव लटिके [13] । मा , तयाचे कार्य हें केतुके ? । 13 खोटे
म्हणौनि संसाररुख सतुके [14] । वावोचि [15] गा ! ।।223।। 14 तुलनात्मक विचाराने
आणि , अंतु यया नाही । ऐसे बोलिजें जें काही , । 15 खोटा
तेही साचचि , पाही , । येके परी ।।224।।
तरी , प्रबोधु जंव नोहे , । तंव , निद्रे काय अंतु आहें ? ।
कीं , रात्री न सरे , तंव न पाहे [16] । तया आरौते [17] ?।।225।। 16 पहाट 17 पूर्वी
तैसा , जंव पार्था ! । विवेकु नुधवी [18] माथा , । 18 उठत नाही
तंव , अंतु नाही अश्वत्था । भवरूपा या ।।226।।

वाजतें वारें निवांत । जंव न राहे जेथिंचे तेथ , ।
तंव , तरंगतां अनंत । म्हणावीचि कीं ! ।।227।।
म्हणौनि , सूर्यु जै हारपे , । तै , मृगजळाभासु लोपे ।
कां , प्रभा जाय , दीपे । मालवलेनि ।।228।।
तैसे , मूळ अविद्या खाये ,। तें ज्ञान जै उभे होये , ।
तैचि यया अंतु आहें , । एऱ्हवी नाही ।।229।।
तेवीचि हा " अनादी " । ऐसी ही आथी शाब्दी [1] , । 1 केवळ बोलापुरते आहें
तो आळु [2] नोहे , अनुरोधी । बोलाते या [3]।।230।। 2 खोटे 3 विवेचनाला अनुरुप
जें , संसारवृक्षाच्या ठायी । साचोकार तंव नाही , ।
मा , नाही तया आदि काई । कोण होईल ? ।।231।।
जो साच जेंथूनि उपजें , । तयाते "आदि " हें साजे [4] , । 4 शोभते
आतां , नाहीचि तो म्हणिजे , । कोठूनिया ? ।।232।।
म्हणौनि,जन्मे ना आहें,। ऐसिया सांगो कवण "माये" ? ।
यालागी , नाहीपणेचि होये , । अनादि हा ।।233।।
वांझेचिया लेकां , । कैची जन्मपत्रिका ? ।
नभी निळी भूमिका । के कल्पू पां ? ।।234।।
व्योमकुसुमांचा पांडवा ! । कवणे देठु तोडावा ? ।
म्हणौनि , नाही ऐसिया भवा , । आदि कैची ? ।।235।।
जैसे , घटाचे नाहीपण , । असतचि असे , केलेनिवीण , ।
तैसा , समूळ वृक्षु जाण । आनादि हा ।।236।।
अर्जुना ! ऐसेनि पाही , । आद्यंतु ययासि नाही ।
माजी , स्थिती आभासे कांही,। परी टवाळ [5] ते ।।237।। 5 खोटे
ब्रह्मगिरीहूनि न निगे । आणि , समुद्रीही कीर न रिगे , ।
माजी , दिसे वाउगे [6] । मृगांबु जैसे ।।238।। 6 मिथ्या
तैसा , आद्यंती कीर नाही , । आणि , साचचि नोहे कही , ।
परी , लटिकेपणाची नवाई । पडिभासे [7] गा ! ।।239।। 7 भासतो
नाना रंगी गजबजे । जैसे , इंद्रधनुष्य देखिजे , ।
तैसा , नेणतया आपजे[8] । आहें ऐसा ।।240।। 8 अज्ञानी माणसाला
ऐसेनि , स्थितीचिये वेळे , । भुलवी अज्ञानाचे डोळे । वाटतो 9 बहुरुपी
लाघवी [9] हरी मेखळे [10] । लोकु जेसा ।।241।। 10 वेष बदलून भुलवतो
आणि,नसतीचि श्यामिका [11] । व्योमी दिसे, तैसी, दिसो कां,। 11 निळीमा
तरी दिसणेही क्षणा एका । होय जाय ।।242।।
स्वप्नीही मानिले लटिके !।तरी निर्वाहो [12] कां एकसारिखे [13] ? ।2 टिकणे 13 एकासारखे
तेवी , आभासु हा क्षणिके । रिताचि गा ! ।।243।।

देखतां , आहें आवडे [1] । घेऊं जाइजे , तरी नातुडे [2] ।
जैसा , टिकु कींजे [3] माकडे । जळामाजी ।।244।।
तरंगभंगु सांडी पडे [4] । विजूही न पुरे होडे [5] ।
आभासासि तेंणे पाडे , । होणे , जाणे गा ! ।।245।।
जैसा , ग्रीष्मशेषीचा वारा , । नेणिजे , समोर कीं पाठीमोरा , ।
तैसी , स्थिती नाही तरुवरा । भवरूपा यया ।।246।।
एवं , आदि ना अंतु स्थिती , । ना रूप ययासि आथी , ।
आतां कायसी कुंथाकुंथी ? । उन्मूळणी गा ! ।।247।।
आपुलिया अज्ञानासाठी । नव्हता थांवला [6] किरीटी ! ।
तरी आतां , आत्मज्ञानाच्या लोटी । खांडेनि [7] गा ! ।।248।।
वाचूनि , ज्ञानेवीण एके । उपाय करिसी जितुके , ।
तिही गुंफसि अधिके । रुखी इये ।।249।।
मग किती खांदोखांदी । यया , हिंडावे ऊर्ध्वी अधीं ? ।
म्हणौनि , मूळचि अज्ञान छेदी । सम्यकज्ञाने ।।250।।
एऱ्हवी , दोरीचिया उरगा [8] । डांगा [9] मेळविता पै , गा ! ।
तो शिणुचि वाउगा [10] । केला होय ।। 251।।
तरावया मृगजळाची गंगा , । डोणीलागी [11] धांवता दांगा-।
माजी वोहळे [12] बुडिजे पै , गा ! । साच जेवी ।। 252।।
तेवी , नाथिलिया [13] संसारा , । उपाई जाचतया [14] , वीरा !
आपणपें लोपे [15] , वारा । विकोपी [16] जाय ।।253।।
म्हणौनि , स्वप्नीचिया घाया [17] । ओखद चेवोचि धनंजया ! ।
तेवी , अज्ञानमुळा यया , । ज्ञानचि खड्ग ।।254।।
परी , तेचि लीला परजवे , । तैसे , वैराग्याचे नवे ।
अभंगबळ होआवे । बुद्धीसी गा ! ।।255।।
उठिलेनि वैराग्ये जेणे । हा त्रिवर्गु [18] ऐसा सांडणे , ।
जैसे वमुनिया सुणे [19] । आतांचि गेले ।। 256।।
हा ठायवरी पांडवा ! । पदार्थजाती आघवा ।
विटवी , तो होआवा ।वैराग्य लाठु [20] ।।257।।
मग देहाहंतेचे दळे [21] । सांडूनि एकेचि वेळे ।
प्रत्यक् बुद्धी [22] करतळे । हातवसावे [23] ।।258।।
निसळे विवेकसाहणे [24] । जें ब्रह्मास्मिबोधे सणाणे [25] ।
मग , पुरतेनि बोधे उटणे [26] । एकलेचि ।। 259।।
परी , निश्चयाचे मुष्टिबळ । पाहावे एकदोनी वेळ , ।
मग तुळावे [27] अति चोखाळ । मननवरी [28] ।।260।।

1 भासतो 2 सापडत नाही
3 चेष्टा करणे
4 हार खाते 5 शर्यतीत मागे पडते
6 बळावला
7 तलवारीने
8 साप 9 दंडा
10 व्यर्थ 11 नाव तयार करण्याकरता
12 रानातल्या वोहळात
13 खोट्या 14 उपायाचे कष्ट 15 आपले खरे स्वरुप नष्ट होते
16 भ्रमाचा क्षोभ होतो
17 जखम
18 धर्म,अर्थ काम
19 कुत्रे
20 बलवान
21 देहाभिमानाचे वेष्टन
22 आत्मज्ञान 23 मुठीत धरावे
24 परमार्थरुपी सहाणेवर पाजळलेले 25 तीक्ष्ण होते
26 ऐक्यबोधाने उजळते
27 तोलून 28 मननाच्या बळाने

पाठी , हतियेरां आपणयां [1] । निदिध्यासे [2] एक जालिया ।
पुढे दुजे नुरेल धाया-। पुरते [3] गा ! ।।261।।
तें आत्मज्ञानाचे खांडे [4] । अद्वैत प्रभेचेनि वाडे [5] ।
नेदील उरो कवणेकडे । भववृक्षासी ।। 262।।
शरदागमीच वारा । जैसा केरु फेडी अंबरा ।
कां , उदयला रवी , आंधारा । घोंटु भरी ।।263।।
नाना , उपवढ [6] होतां खेवो [7] । नुरे स्वप्नसंभ्रमाचा ठावो ।
स्वप्रतीतिधारेचा वाहो [8]। करील तैसे ।। 264।।
तेव्हां , ऊर्ध्वींचे मूळ , । कां , अधींचे हन , शाखाजाळ ।
ते , काहीचि न दिसे , मृगजळ । चांदिणा जेवी ।।265।।
ऐसेनि गा वीरनाथा ! । आत्मज्ञानाचिया खङ्गलता ।
छेदूनिया भवाश्वत्था । ऊर्ध्वमूळातें ।।266।।

1 हत्यार आणि आपण 2 एकाग्र चिंतनाने 3 प्रहारापुढे
4 दुधारी तलवार 5 उत्कर्षाने
6 जागे होताच 7 लगेच
8 प्रवाह

**ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन् गता न निवर्तन्ति भूयः ।**
**तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ।।4।।**

**नंतर सृष्टिक्रमाची ही ''पुरातन प्रवृत्ति ज्यापासून निघाली त्याच आद्य पुरुषाकडे मी जातो '' अशा संकल्पाने ,जेंथे गेले असतां पुनः माघारे येत नाहीत, ते स्थान शोधून काढावे**

मग इदंतेसि वाळले [9] । जे , '' मीपणेवीण '' डाहारले [10] ।
तें रूप पाहिजें आपले ।आपणचि ।।+267।।
परी , दर्पणाचेनि आधारे , । एकचि करूनि दुसरे ।
मुख पाहाती गव्हारे [11] , । तैसे नको हो ।।268।।
हें पाहाणे ऐसे असे वीरा ! । जैसा,न बोडलिया [12] विहिरा ।
मग , आपलिया उगमी झरा । भरोनि ठाके ।।269।।
नातरी , आटलिया अंभ [13] । निजबिंबी प्रतिबिब ।
निहटे [14] , कां , नभी नभ , । घटाभावी ।।270।।
नाना , इंधनांशु सरलेया , । वन्हि परतें जेवी आपणपयां ।
तैसे , आपेआप , घनंजया ! । न्याहाळणे जें गा ! ।।271।।
जिव्हे , आपली चवी चाखणे , । चक्षु , निज बुबुळ देखणे ।
आहें , तया ऐसे निरीक्षणे । आपुले पै ।।272।।
कां , प्रभेसि प्रभा मिळे , । गगन गगनावरी लोळे , ।
नाना , पाणी भरले खोळे [15] । पाणियाचिये ।।273।।
आपणचि आपणयाते । पाहिजें [16] , जे , अद्वैते , ।
तें ऐसे होय निरुतें [17] । बोलिजतु असे ।।274।।

9.''हे''पणा दूर केला
10 प्रसिद्ध असणे
11 मूर्ख
12 न खोदलेल्या
13 पाणी आटल्यावर
14 मिळते
15 पदरात
16 पाहणे
17 निश्चितपणे

जे , पाहिजतेनवीण पाहिजे , । कांही नेणणाचि जाणिजे , । 1 ठिकाणाला
आद्यपुरुष कां म्हणिजे । जया ठायाते [1] ।।275।। 2 देहादिप्रपंचाचा 3 आधार
तेथहि , उपाधीचा [2] वोथंबा [3] । घेऊनि श्रुति उभविती जिभा । 4 व्यर्थ गलबला
मग नामरुपाचा वडंबा [4] । करिती वायां ।।276।। 5 संसार आणि स्वर्ग
पै , भवस्वर्गा [5] उबगले । मुमुक्षु , योगज्ञाना वळघले [6] । 6 आश्रय केला
पुढती , '' न यो '' इया निगाले । पैजा [7] जेथ ।।277।। 7 प्रतिज्ञा करून
संसाराचिया पायां पुढां , । पळती वीतराग [8] होडा [9] । 8 विरक्त 9 पैजेंने
ओलांडोनि ब्रह्मपदाचा कर्मकडा । घालिती मागां ।।278।।
अहंतादिभावां आपुलियां , । झाडा देऊनि आघवेया , ।
पत्र घेती [10] ज्ञानिये जया । मूळघरासी ।।279।। 10 परवाना घेतात
पै , जेंथुनि हें एवढी । विश्वपरंपरेची वेलांडी [11] । 11 विस्तार
वाढती आशा जैसी कोरडी । निदैवाची [12] ।।280।। 12 दुर्दैवी
जिये कां वस्तूचे नेणणे । आणिले थोर जगा जाणणे , ।
''  नाही  ''  ते नांदविले जेणे । '' मी , तूं  ''  जगी ।।281।।
पार्था ! ते वस्तु पहिले । आपणपें आपुले ।
पाहिजे , जैसे हिंवले । हिव , हिवे ।।+282।।
आणीकही एक तया । वोळखण असे धनंजया ! ।
तरी जया कां भेटलिया , । येणेचि नाही ।।283।।
परी तया भेटती ऐसे । जे , ज्ञाने सर्वत्र सरिसे ।
महाप्रळयांबूचे जैसे । भरलेपण ।।284।।

**निर्मानमोहा जितसङ्दोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामा ः ।**
**द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैर्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत् ।।5।।**

**मान व मोह यांनी जे विरहित, आसक्तिदोष ज्यांनी जिंकिला आहे; अध्यात्मज्ञानाचे  ठिकाणी जे नेहमी स्थिर , जे निष्काम आणि सुखदुःखसंज्ञक द्वंद्वापासून मुक्त झालेले आहें त, ते ज्ञाते पुरुष त्या अव्यय स्थानाला जाऊन पोचतात.**

जया पुरुषाचे कां मन । सांडोनि गेले मोह , मान , ।
वर्षाती जैसे घन , । आकाशाते ।।285।।
निकवड्या [13] निष्ठुरा [14] । उबगिजें जेवी सोयरा , । 13 दरिद्री 14 निर्दय
तैसे , नागवती [15] विकारा , । वेटाळूं जे ।।286।। 15 गुंतत नाहीत
फळली केळी उन्मुळे [16] , । तैसी , आत्मलाभे प्रबळे , । 16 उन्मळून पडते
तयाची क्रिया ढाळेढाळे [17] । गळती आहें  ।।287।। 17 हळुहळु
आगी लागलिया रुखी । देखोनि , सैरा पळती पक्षी ।
तैसे , सांडिले अशेखी । विकल्पी [18] जें ।।288।। 18 वाईट विचार

आईके , सकळ दोषतृणी । अंकुरिजती जिये मेदिनी , ।
तिये भेदबुद्धीची काहाणी । नाही जयातें ।।289।।
सूर्योदयासरिसी , । रात्र पळोनि जाय अपैसी , ।
गेली देहअहंता तैसी , । अविद्येसवे ।।290।।
पै , आयुष्यहीना जीवाते । शरीर सांडी जेवी अवचितें , ।
तेवी , निदसुरे [1] द्वैतें । सांडिले जें ।।291।।
लोहाचे सांकडे [2] परिसा , । न जोडे अंधारु रवि जैसा , ।
द्वैतबुद्धीचा तैसा । सदा दुकाळ [3] जया , ।।292।।
अगा ! सुखदुःखाकारे । द्वंद्वे , देही जिये गोचरे [4] , ।
तिये जयां कां समोरे । होतीचिना ।।293।।
स्वप्नीचे राज्य कां मरण , । नोहे हर्षशोकांसि कारण ।
उपवढलिया [5] जाण [6] । जियापरी ।।294।।
तैसे , सुखदुःरूपी । द्वंद्वी , जे पुण्यपापी , ।
न घेपिजती [7] सर्पी । गरुड , जैसे ।।295।।
आणि अनात्मवर्गनीर [8] । सांडूनि , आत्मरसाचे क्षीर ।
चरताति , जे सविचार [9] । राजहंसु ।।296।।
जैसा , वर्षोनि भूतळी , । आपला रसु अंशुमाळी [10] ।
मागौता आणी रश्मिजाळी । बिंबासीचि ।।297।।
तैसे , आत्मभ्रांतीसाठी [11] । वस्तु [12] विखुरली बारावाटी ।
ते एकवटिती ज्ञानदृष्टी , । अखंड जे ।।298।।
किंबहुना , आत्मयाचा । निर्धारी विवेकु जयांचा , ।
बुडाला वोघु गंगेचा । सिंधुमाजी जैसा ।।299।।
पै , आघवेचि आपलेपणे , । नुरेचि जया अभिलाषणे [13] ।
जैसे , येथूनि पऱ्हां [14] जाणे , । आकाशा नाही ।।300।।
जैसा , अग्नीचा डोंगरु , । नेघे कोणी बीज अंकुरु , ।
तैसा , मनी जयां विकारु । उदैजेंना ।।301।।
जैसा , काढिलिया मंदराचळु, । राहे क्षीराब्धि निश्चळु , ।
तैसा , नुठी जयां सळु [15] । कामोर्मीचा ।।302।।
चंद्रमा कळीं धाला [16] । न दिसे , कोणे आंगी वोसावला [17] ।
तेवी , अपेक्षेचा अवखळा [18] । न पडे जयां ।।303।।
हें किती बोलूं असांगडे [19] । जेवी परमाणु नुरे वायुपुढे , ।
तैसे विषयांचे नावडे । नांवचि जयां ।।304।।
एवं , जें , जे , कोणी ऐसे । केले , ज्ञानाग्नि हुताशे , ।
तें तेथ मिळती , जैसे ।हेमी हेंम ।।305।।

1 अज्ञानात्मक
2 कमतरता
3 दुष्काळ
4 प्रकट होतात
5 जागे झाल्यावर 6 समजते
7 वेढले जात नाहीत
8 असत् वर्गाचा समुदाय
9 चांगल्या विचाराचे
10 सूर्य
11 स्वतःचा भ्रम 12 ब्रह्म
13 इच्छा करणे
14 पलिकडे
15 उसळी
16 चंद्रकला लागल्या
17 कमी भासतो 18 न्यूनत्व
19 निरुपम

तेंथ म्हणिजे कवणे ठाई ?। ऐसेही पुससी काही ।
तरी , ते पद गा ! नाही । वेचु [1] जया ।।306।।  1 ऱ्हास
दृष्यपणे देखिजे , । कां , ज्ञेयत्वे जाणिजे , ।
अमुके ऐसे म्हणिजें । '' तें '' जें नव्हे ।।307।।

**न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः ।**
**यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ।।6।।**
**जेंथे गेले असता परत येत नाहीत, असे ते माझे परम स्थान होय. ते ना सूर्य, ना चंद्र ना अग्नीहि प्रकाशित नाही**

पै , दीपाचिया बंबाळी [2] । कां चंद्र हन जे उजळी , ।  2 मोठा प्रकाश
हें काय बोलो ! अंशुमाळी । प्रकाशी जे , ।।308।।
तें आघवेचि दिसणे । जयाचे कां न देखणे , ।
विश्‍व भासतसे जेणे । लपालेनी ।।+309।।
जैसे शिंपीपण हारपे , । तंव , तंव , खरे होय रुपें ।
कां दोरी लोपतां , सापे [3] । फार होईजे [4] ।।+310।।  3 साप 4 स्पष्ट होते
तैसी , चंद्रसूर्यादि थोरे , । इये तेजे जिये फारे [5] ।  5 विस्तार पावतात
तिये जयाचेनि आधारे । प्रकाशती ।।311।।
ते वस्तु कीं तेजोराशी । सर्वभूतात्मक सरिसी ।
चंद्रसूर्याच्या मानसी [6] । प्रकाशे जे ।।312।।  6 प्रमाणे
म्हणौनि,चंद्रसूर्य कडवसा [7] । पडती,वस्तुच्या प्रकाशा ।  7 तुलनेत कमी पडतात
यालागी , तेज जे तेजसा , । ते वस्तुचे आंग ।।313।।
आणि जयाच्या प्रकाशी , । जग हारपे चंद्रार्केसी ।
सचंद्र नक्षत्रे जैसी , । दिनोदयी ।।314।।
नातरी, प्रबोधलिये वेळे,। ते स्वप्नीची डिडिमा [8] मावळे ।  8 पसारा
कां , नुरेचि सांजवेळे । मृगतृष्णिका ।।315।।
तैसा , जिये वस्तूच्या ठायी । कोण्हीच कां आभासु नाही ।
ते माझे निजधाम पाही । पाटाचे [9] गा ! ।।316।।  9 श्रेष्ठ
पुढती , जे तेथ गेले । ते , न घेतीच माघौती पाऊले ।
महोदधी कां मिनले । स्त्रोत जैसे ।।317।।
कां,लवणाची कुंजरी [10] । सूदलिया [11] लवणसागरी ।  10 हत्तीण 11 घातली असता
होयचि ना माघारी । परती , जैसी ।।318।।
नाना , गेलिया अंतराळा , । न येतीचि वन्हिज्वाळा , ।
नाही तप्तलोहौनि जळा । निघणे जेवी ।।319।।

तेवी , मजसी एकवट । जे जाले , ज्ञाने चोखट , ।
तया , पुनरावृत्तीची वाट । मोडली गा ! ।।320।।
तेथ , प्रज्ञापृथ्वीचा रावो । पार्थु , म्हणे , '' जी , जी पसावो [1] । — 1 प्रसन्न व्हा
परी विनंती एकीं देवो , । चित्त देतु ।।321।।
तरी देवेंसि स्वयें एक होती , । मग माघौते जे न येती , ।
ते देवेंसि भिन्न आथी ? । की , अभिन्न जी ? ।।322।।
जरी भिन्नचि अनादिसिद्ध , । तरी , न येती , हें असंबद्ध ।
जे फुलां गेले षटपद [2] । ते फुलेचि होती पां ? ।।323।। — 2 भ्रमर
पै , लक्ष्याहुनि अनारिसे [3] । बाण , लक्ष्यी शिवोनि जैसे । — 3 वेगळे
मागुते पडती , तैसे । येतीचि ते ।।324।।
नातरी , तूंचि ते स्वभावे , । तरी , कोणे कोणासि मिळावे ? ।
आपणयासी आपण रुपावे । शस्त्रे केवी ? ।।325।।
म्हणौनि , तुजसी अभिन्ना जीवां , । तुझा संयोगवियोगु , देवा ! ।
नये बोलो , अवयवां । शरीरेसी ।।326।।
आणि , जे सदा वेगळे तुजसी , । तया मिळणी नाही कोणे दिवशी ।
मा , येती न येती , हें कायसी । वायबुद्धि ? ।।327।।
तरी , कोण गा तें ? तूंते । पावोनि न येती माघौते ? ।
हें विश्वतोमुखा ! माते । बुझावी जी ! '' ।।328।।
इये आक्षेपी अर्जुनाच्या , । तो शिरोमणी सर्वज्ञांचा ।
तोषला बोध शिष्याचा । देखोनिया ।।329।।
मग म्हणे , '' गा ! महामती ! । माते पावोनि न येती पुढती , ।
ते भिन्नाभिन्न रीती । आहात दोनी ।।330।।
जै , विवेके खोले [4] पाहिजे । तरी , मी तेचि ते , सहजे । — 4 नीट विचार केला
ना , आहाचवाहाच [5] तरी दुजे , । ऐसेही गमती ।।331 — असता 5 वरवर पाहता
जेसे , पाणियावरी वेगळ । तळपतां दिसती कल्लोळ ।
येऱ्हवी तरी , निखिळ । पाणीचि ते ।।332।।
कां , सुवर्णाहुनि आने [6] । लेणी गमती भिन्ने । — 6 वेगळी
मग पाहिजे तंव सोने । अवघेचि ते ।।333।।
तैसे , ज्ञानाचिये दिठी , । मजसी अभिन्नचि ते किरीटी ! ।
येर , भिन्नपण ते उठी , । अज्ञानास्तव ।।334।।
आणि , साचोकारेनि वस्तुविचारे । कैचे मज एकासि दुसरे ?।
जे भिन्नाभिन्नव्यवहारे , । उमसिजेल [7] ।।335।। — 7 सांगतो
आघवेचि आकाश सूनि पोटी । बिंबचि जै आते खोटी [8] । — 8 आत सामावले जाते
तै , प्रतिबिंब कें उठी ? । कें रश्मि शिरे ? ।।336।।

कां,कल्पांतीचिया पाणिया,। काय वोत [1] भरिती धनंजया ? । 1 नदीबाहेर पसरलेले
म्हणौनि , कैचें अंश अविक्रिया [2] । एका मज ? ।।337।। पुराचे पाणी 2 विकारहीन
परी ओघाचेनि मेळे , । पाणी उजू , परी, वांकुडे जाले ।
रवी , दुजेपण आले , । तोयबगे [3] ।।338।। 3 पाण्यामुळे
व्योम , चौफळे कीं वाटोळे , । हें ऐसे कायिसयाही मिळे , ।
परी , घटमठी वेटाळे । तैसेही आथी ।।339।।
हां गा ! निद्रेचेनि आधारे , । काय एकलेनि जग न भरे ? ।
स्वप्नीचेनि जै अवतरे । रायपण ।।340।।
कां, मिनलेनि किडाळे [4] ,। वानिभेदासि ये सोळे [5] । 4 हिणकस धातु 5 शुद्ध सोने
तैसा , स्वमाये वेटाळे । शुद्ध जै मी ।।341।।
तै अज्ञान एक रूढे , । तेणे कोऽहंविकल्पाचे मांडे , ।
मग विवरूनि कींजें फुडे [6] । देहो मी ऐसे ।।342।। 6 निर्णय करतो

**ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।**
**मनःषष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ।।7।।**

**माझाच सनातन अंश जीवलोकीं म्हणजें कर्मभूमीत जीव होऊन प्रकृतीत असणारी मनासह सहा म्हणजे मन व पांच सूक्ष्म इंद्रिये तो आपल्याकडे ओढून घेतो . यालाच लिंगशरीर असे म्हणतात**

ऐसे , शरीराचि येवढे । जै आत्मज्ञान वेगळे पडे , ।
तै , माझा अंशु आवडे । थोडेपणे ।।+343।।
समुद्र कां वायुवशें , । तरंगाकार उल्लसे [7] । 7 भासतो
तो , समुद्रांशु ऐसा दिसे । सानिवा [8] जेवी ।।344।। 8 लहानसा
तेवी , जडाते जीवविता , । देहअहंता उपजविता , ।
मी जीव गमे पंडुसुता ! । जीवलोकीं ।।345।।
पै , जीवाचिया बोधा । गोचरु जो हा धांदा [9] , । 9 व्यवहार
तो जीवलोकशब्दा । अभिप्रावो ।।346।।
अगा ! उपजणे , निमणे , । हें साचचि जे कां मानणे , ।
तो जीवलोकु मी म्हणे । '' संसारु '' हन ।।347।।
एवंविध , जीवलोकीं । तूं माते ऐसा अवलोकीं , ।
जैसा , चंद्रु कां उदकीं , ।उदकातीत ।।348।।
पै , काश्मीराचा रवा । कुंकुमावरी पांडवा ! ।
आणिका गमे लोहिवा [10] ; । तो तरी नव्हे ।।349।। 10 तांबडा
तैसे , अनादिपण न मोडे , । माझे अक्रियत्व न खंडे , ।
परी,कर्ता,भोक्ता ऐसे आवडे [11] । ते,जाण गा ! भ्रांती ।।350।। 11 भासते

किंबहुना,आत्मा चोखटु [1];। होऊनि प्रकृतीसी एकवटु , । 1 शुद्ध
बांधे प्रकृतिधर्माचा पाटु [2] । आपणपया ।।351।। 2 प्रकृतीधर्माच्या
पै , मनादि साही इंद्रिये । श्रोत्रादि प्रकृतिकार्ये । सिंहासनावर बसतो
तिये , माझी म्हणौनि होये । व्यापारारुढ ।।352।।
जैसे स्वप्नी , परिव्राजे [3] । आपणपयां आपण कुटुंब होईजे , । 3 संन्यासी
मग , तयाचेनि धांविजें । मोहे सैरा ।।353।।
तैसा , आपलिया विस्मृती , । आत्मा आपणचि प्रकृती-।
सारिखा गमोनि , पुढती । तियेसीचि भजे ।।354।।
मनाच्या रथी वळघे [4] , । श्रवणाच्या द्वारे निघे , । 4 आरूढ होतो
मग शब्दाचिया रिघे । रानामाजी ।।355।।
तोचि प्रकृतीचा वागोरा [5] । त्वचेचिया मोहरा [6] । 5 लगाम 6 मार्गाने
आणि , स्पर्शाचिया घोरा [7] । वना जाय ।।356।। 7 स्पर्शविषयांच्या भयंकर
कोणे एके अवसरी , । रिघोनि नेत्राच्या द्वारी , ।
मग रूपाच्या डोंगरी , । सैरा हिंडे ।।357।।
कां , रसनेचिया वाटा । निघोनि गा सुभटा ! ।
रसाचा दरकुटा [8] । भरोचि लागे ।।358।। 8 रसविषयांची दरी
नातरी , येणेचि घ्राणे । जै देहांशु करी निघणे , ।
मग गंधाची दारूणे । आडवें [9] लंघी ।।359।। 9 अरण्ये
ऐसेनि , देहेंद्रियनायके । धरूनि मन जवळिके , ।
भोगिजती शब्दादिके । विषयभरणे ।।360।।

**शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः।**
**गृहीत्वैतानि संयाति वायुर्गन्धानिवाशयात् ।।8।।**
**या ईश्वराला म्हणजे जीवाला जेव्हा स्थूल शरीर प्राप्त होते , आणि जेव्हां तो स्थूल शरीरातून निघून जातो,तेव्हां, गंधाच्या पुष्पादि आश्रयापासून वायु जसा गंध, तद्वत् हा जीव वरील मन व पांच इंद्रिये बरोबर घेऊन जातो .**

परी कर्ता , भोक्ता ऐसे । हे जीवाचे तैचि दिसे , ।
जै , शरीरी कां पैसे [10] । एकाधिये ।।361।। 10 प्रवेश करतो
जैसा,आथिला [11] आणि विलासिया,।तैचि वोळखो ये धनंजया!। 11 ऐश्वर्य संपन्न
जै , राजसेव्या [12] ठाया [13] । वस्तीसि ये ।।362।। 12 राजेश्वर्य भोगणारा
तैसा,अहंकर्तृत्वाचा वाढु,। कां,विषयेंद्रियांचा धुमाडु [14] , । 13मुक्कामास
हा जाणिजे ,तै निवाडु [15] । जै , देह पाविजे ।।363।। 14 धुमाकुळ 15 निवड
अथवा , शरीराते सांडी , । तऱ्ही इंद्रियांची तांडी [16] । 16 समुदाय
आपणयांसवे काढी , । घेऊनि जाय ।।364।।

जेसा , अपमानिला अतिथी , । ने सुकृताचि संपत्ति , ।
कां , साइखडेयाची [1] गती , । सूत्रतंतु ।।365।। 1 कळसुत्री बाहुले
नाना , मावळतेनि तपने [2] । नेइजेंती लोकांची दर्शने [3] । 2 सूर्य 3 दृष्टी
हें असो ; द्रुती पवने । नेईजे जैसी ।।366।।
तेवी , मनःषष्ठां ययां । इंद्रियांते धनंजया ! ।
देहराजु ने , देहा-। पासूनि गेला ।।367।।

**श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च ।**
**अधिष्ठायं मनश्चायं विषयानुपसेवतें ।।9।।**

**कान,डोळे, त्वचा व जीभ आणि नाकहि , तसेच मन, यांचे ठायी ठाणे देऊन हा जीव विषयांचा उपभोग घेत असतो.**

मग येथ अथवा स्वर्गी , । जेथ जे देह आपंगी [4] , । 4 आश्रय करतो
तेंथ तैसेचि पुढती पांगी [5] , । मनादिक ।।368।। 5 पसरतो
जैसा , मालवलिया दिवा , । प्रभेसि जाय पांडवा ! ।
मग उजळिजें तेथ , तेधवां । तैसाचि फांके ।।369।।
तरी , ऐसैसिया राहाटी [6] । अविवेकियांचे दिठी । 6 व्यवहार करितो
येतुले , हे किरीटी ! । गमेचि गा ! ।।370।।
जे आत्मा देहासि आला । आणि , विषयो येणेचि भोगिला , ।
अथवा , देहोनि गेला , । हें साचचि मानिती ।।371।।
एऱ्हवी , येणे आणि जाणे , । कां, करणे हन भोगणे , ।
हें प्रकृतीचे तेणे । मानियेले ।।372।।

**उत्क्रामन्तं स्थितं वाऽपि भुंजानं वा गुणान्वितम् ।**
**विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः ।।10।।**
**यतन्तो योगिनश्चैनं पश्यंत्यात्मन्यवस्थितम् ।**
**यतंतोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यंत्यचेतसः ।।11।।**

**शरीरातून निघून जाणारास अथवा रहाणारास किंवा गुणांनी युक्त होऊन (स्वतः नव्हे ) उपभोग घेणारास मूर्ख लोक जाणीत नाहीत. ज्ञानचक्षुनें पहाणारे लोक त्यास ओळखितात . तसेच प्रयत्न करणारे जे योगी ते आपले ठायी स्थित असलेल्या या आत्म्यास ओळखितात. पण ज्यांचा आत्मा म्हणजें बुद्धि संस्कृत नाही असे अज्ञ लोक प्रयत्न करूनहि याला ओळखीत नाहीत.**

परी,देहाचे मोटके [7] उभे,। आणि,चेतना तेथ उपलभे [8] ,। 7 गाठोडे 8 प्राप्त होते
तिये चळवळेचेनि लोभे । आला म्हणती ।।373।।

तैसेचि , तयां संगती । इंद्रिये आपुलाल्या अर्थी वर्तती , ।
तया नांव सुभद्रापती ! । भोगणे जया ।।374।।
पाठी भोगक्षीण ,आपैसे । देह गेलिया , ते न दिसे ; ।
तेथे , गेला , गेला ऐसे । बोभाती [1] गा ! ।।375।। 1 बडबडतात
पै , रुखु डोलतु देखावा , । तरी वारा वाजतु मानावा ? ।
रुख नसे तेथे पांडवा । नाही तो गा ? ।।376।।
कां , आरिसा समोर ठेविजें,। आणि , आपणपें तेथ देखिजें , ।
तरी तेधवांचि जाले मानिजे , । काय आधी नाही ? ।।377।।
कां , परता केलिया आरिसा , । लोपु जाला तया आभासा , ।
तरी आपणपें नाही ऐसा । निश्चयो करावा ? ।।378।।
शब्द तरी आकाशाचा , । परी कपाळी पिटे मेघाचा , ।
कां चंद्री , वेगु अभ्राचा । आरोपिजें ? ।।379।।
तैसे , होइजें जाइजे देहे । ते , आत्मसत्ते अविक्रिये [2] । 2 अविकारी
निष्टंकिती [3] गा मोहे , । आंधळे ते ।।380।। 3 निश्चित करतात
येथ,आत्मा आत्मयाच्या ठायी । देखिजें , देहीचा धर्मु देही , ।
ऐसे देखणे , ते पाही , । आन आहाती ।।381।।
ज्ञाने कां जयाचे डोळे । देखोनि, न राहाती देहीचे खोळे , ।
सूर्यरश्मी आणियाळे [4] । ग्रीष्मी [5] जैसे ।।382।। 4 तीक्ष्ण 5 उन्हाळ्यात
तैसे , विवेकाचेनि पैसे [6] , । जयाची स्फूर्ती स्वरूपी बैसे , ।
ते ज्ञानिये देखती , ऐसे । आत्मयाते ।।383।।
जैसे , तारांगणी भरले । गगन समुद्री बिंबले , ।
परी , ते तुटोनि नाही पडले । ऐसे निवडे [6] ।।384।। 6 ठरवतात
गगन गगनीचि आहें , । हें आभासे , ते वाये [7] । 7 आभास
तैसा , आत्मा देखती , देहे । गंवसिलाही [8] ।।385।। 8 गुरफटला असला तरी
खळाळाच्या लगबगी [9] । फेडूनि [10] खळाळाच्या भागी , । 9 खळबळणाऱ्या पाण्याचे
देखिजे चंद्रिका कां उगी । चंद्री जेवी ।।386।। चंचलतेस 10 दूर करून
कां,नाडरचि [11] भरे,शोषे ,। सूर्यु तो जैसा तैसाचि असे । 11 डबके
देह होतां जातां , तैसे । देखती मातें ।।387।।
घटु मठु घडले , । तेचि पाठी मोडले , ।
परी , आकाश ते संचले [12] । असतचि असे ।।388।। 12 बनलेले
तैसे , अखंडे आत्मसत्ते । अज्ञानदृष्टि कल्पिते ।
हें देहचि होतें जाते । जाणती फुडे [13] ।।389।। 13 खरोखर
चैतन्य चढे ना वोहटे , । चेष्टवी ना चेष्टे [14] , । 14 कर्म करवीत नाही कीं
ऐसे आत्मज्ञाने चोखटे [15] । जाणती ते ।।390।। करत नाही 15 शुद्ध

आणि ज्ञानही आपैतें [1] होईल, ।प्रज्ञा परमाणुही उगाणा [2] घेईल , । 1 स्वाधीन 2 बोध
सकळ शास्त्रांचे येईल , । सर्वस्व हाता ।।391।।
परी तें व्युत्पत्ति [3] ऐसी , । जरी विरक्ति न रिगे मानसी , 3 ज्ञान
तरी , सर्वात्मका मजसी । नव्हेचि भेटी ।।392।।
पै,तोंड भरो कां विचारा,। आणि,अंतःकरणी विषयांसि थारा,।
तरी नातुडे [4] धनुर्धरा ! । त्रिशुद्धी मी ।।393।। 4 प्राप्त होत नाही
हां गा ! वोसणतयाच्या ग्रंथी [5] । काई तुटती संसारगुंती ? । 5 बडबडकरणाऱ्याच्या
कीं , परिवसिलिया [6] पोथी , । वाचिली होय ? ।।394।। ग्रंथवाचनाने 6 स्पर्श
नाना , बांधोनिया डोळे , । घ्राणी लाविजती मुक्ताफळे [7] , । केला म्हणजे 7 मोती
तरी तयांचे काय कळे । मोल , मान ? ।।395।।
तैसा, चित्ती अहंतें ठावो, । आणि जिभे सकळशास्त्रांचा सरावो, ।
ऐसेनि कोडी एक [8] जन्म जावो, । परी न पविजे मातें ।।396।। 8 एक कोटी
जो , एक मी कां समस्ती । व्यापकु असे भूतजाती , ।
ऐक , तिये व्याप्ती [9] । रूप करूं ।।397।। 9 विवेचन

**यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ।**
**यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ।।12।।**

**जे तेंज सूर्यामध्ये असून सर्व जगाला प्रकाशित करिते, जे तेज चंद्रांत आणि अग्नीत आहें ते माझेच तेज असे समज.**

तरी , सूर्यासकट आघवी । हें विश्वरचना जे दावी [10] , । 10 दाखवते
ते दीप्ति माझी जाणावी । आद्यंती [11] आहें ।।398।। 11 मूळ
जल शोषूनि गेलिया सविता , । ओलांश पुरवीतसे जें माघौता , ।
ते , चंद्री पंडुसुतां ! । ज्योत्स्ना माझी ।।399।।
आणि , दहन-पाचनसिद्धी । करीतसे जे निरवधी [12] । 12 अमर्याद
ते हुताशी तेंजोवृद्धी । माझीचि गा ! ।।400।।

**गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा ।**
**पुष्णमि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः ।।13।।**

**तसेच पृथ्वीमध्ये प्रवेश करून मीच सर्व भूतें आपल्या तेंजाने धारण करितो, आणि रसात्मक सोम म्हणजें चंद्र होऊन सर्व औषधींचे म्हणजे वनस्पतींचे पोषण करितो.**

मी रिगालो असे भूतळी । म्हणौनि , समुद्र, महाजळी ।
हें पांसूचि ढेपुळी [13] । विरेचिना ।।401।। 13 मातीची ढेकळे

आणि , भूतेही चराचरे । हें धरितसे जिये अपारे [1] । — 1 अमर्याद
तिये मीचि धरी , धरे । रिगोनियां ।।402।।
गगनी मी पंडुसुता ! । चंद्राचेनि मिसे अमृता ।
भरला , जालो चालता । सरोवरु ।।403।।
तेंथूनि फांकती रश्मिीकर ।ते पाट पेलूनि अपार [2] । — 2 अमर्याद ओघ
सर्वौषधींचे आगर । भरित असे मी ।।404।। — सावरून धरुन
ऐसेनि , सस्यादिकां [3] सकळां , । करी धान्यजाती सुकाळा । — 3 धान्यादिका
हें अन्नद्वारां जिव्हाळा । भूतजाता ।।405।।
आणि , निपजविले अन्न , । तरी , तैसे कैचे दीपन ? ।
जेंणे जिरूनि समाधान । भोगिती जीव ! ।।406।।

**अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ।**
**प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ।।14।।**

**मी वैश्वानररुप अग्नि होऊन प्राण्यांच्या देहांत राहिलो असून, प्राण व अपान यांनी युक्त होत्साता भक्ष्य,चोष्य,लेह्य व पेय असे चार प्रकारचे अन्न पचन करितो .**

म्हणौनि,प्राणिजातांच्या घटी,।करूनि कंदावरी [4] आगिठी,। — 4 नाभीकंदाचे ठीकाणी
दीप्ति जठरीही किरीटी ! । मीचि जालो ।।407।।
प्राणापानाच्या जोडभाती , । फुंफुंकोनियां अहोराती , ।
आटीतसे , नेणो किती , । उदरामाजी ।।408।।
शुष्के अथवा स्निग्धे , । सुपक्वे कां विदग्धे [5] , । — 5 करपलेले
परी , मीचि गा चतुर्विधे । अन्ने पची ।।409।।
एवं , मीचि आघवे जन , । जना निरवितें मीचि जीवन , ।
जीवनी मुख्य साधन । वन्हिही , मीचि ।।410।।
आतां , ऐसियाहीवरी काई , । सांगो व्याप्तीची नवाई ! ।
येथ दुजें नाहीचि , घेई । सर्वत्र मी गा ! ।।411।।
तरी , कैसेनि पां वेखे [6] । सदा सुखिये एके ? । — 6 कारणाने
एके तिये बहुदुःखे । क्रांत भूतें ? ।।412।।
जैसी , सगळिये पाटणी [7] । एकेचि दीपे दिवेलावणी । — 7 शहरात
जालिया , कां न देखणी । उरली एके ? ।।413।।
ऐसी हन उखिविखी [8] । करित आहासी मानसी कीं , । — 8 तर्कवितर्क
तरी , परिस , तेही निकीं । शंका फेडूं ।।414।।
पै , आघवा मीचि असे । येथ नाही कीर अनारिसे , ।
परी प्राणियांचिया उल्लासे [9] । बुद्धि ऐसा ।।415।। — 9 भासतो

जैसे एकचि आकाशध्वनी , ।वाद्यविशेषी आनानी , ।
वाजावे पडे भिन्नी । नादांतरी ।।416।।
कां , लोकचेष्टी वेगळाला , । जो हा एकुचि भानु उदैला , ।
तो आनानी परी गेला । उपयोगासी ।।417।।
नाना , बीजधर्मानुरुप , । झाडी उपजविले आप , ।
तैसे परिणमले [1] स्वरुप । माझे जीवा ।।418।। 1 परिणाम पावले
**अगा ! नेणा आणि चतुरा , । पुढां निळयांचा दुसरा [2] ।** 2 निळमण्याचा दोन
**नेणा सर्पत्वे जाला , येरा । सुखालागी ।।419।।** पदरी हार
**हें असो ; स्वातीचे उदक , । शुक्ती [3] मोती , व्याळी विख , ।** 3 शिपल्यात
**तैसा , सज्ञानांसी मी सुख , । दुःख तो अज्ञानांसी ।।420।।**

**सर्वस्य चाहं हृदि संन्निविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।**
**वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ।।15।।**
**तसेच सर्वांच्या हृदयात मी अधिष्टित असून स्मृति, ज्ञान व अपोहन म्हणजे तन्नाश , ही माझ्यापासूनच होतात आणि सर्व वेदांनी जें काय जाणावयाचे तें मीच. वेदान्ताचा कर्ता आणि वेद जाणणाराहि मी**

एऱ्हवी , सर्वांच्या हृदयदेशी । मी अमुका आहें ऐसी ।
जे बुद्धि स्फुरे अहर्निशी , । ते वस्तु गा ! मी ।।421।।
परी संतासवे वसतां , । योगज्ञानी पैसता [4] । 4 सराव वाढला म्हणजे
गुरुचरण उपासितां , । वैराग्येसी , ।।422।।
येणेचि सत्कर्मे । अशेषही अज्ञान विरमे ।
जयांचे अहं विश्रामे , । आत्मरूपी ।।423।।
ते आपेआप देखोनि , देखी । मिया आत्मेनि सदा सुखी ।
येथे मीवांचून अवलोकीं । आन हेंतु असे ? ।।424।।
अगा ! सूर्योदयो जालिया , । सूर्ये सूर्यचि पहावा धनंजया ! ।
तेवी , माते मियां जाणावया । मीचि हेतु ।।425।।
ना , शरीरपरातें सेवितां , । संसारगौरवचि ऐकता , ।
देही जयांची अहंता । बुडोनि ठेली ।।426।।
तें स्वर्गसंसारालागी । धांवता कर्ममार्गी ।
दुःखाच्या सेलभागी [5] । विभागी होती ।।427।। 5 सर्वात वाईट दुःखाचे
परी हेही होणे अर्जुना ! । मजचिस्तव तया अज्ञाना ।
जैसा , जागताचि हेतु स्वप्ना । निद्रेते होय ।।428।।
पै , अभ्रे दिवसु हरपला , । तोहि दिवसेचि जाणो आला , ।
तेवी , मी नेणोनि विषयो देखिला , । मजचिस्तव भूती ।।429।।

एवं , निद्रा कां जागणिया , । प्रबोधुचि हेतु धनंजया ! ।
तेवी , ज्ञाना अज्ञाना जीवांचिया , । मीचि मूळ ।।430।।
जैसे , सर्पत्वा कां दोरा , । दोरुचि मूळ धनुर्धरा ! ।
तैसा , ज्ञाना अज्ञानाचिया संसारा , । मियांचि सिद्धु ।।431।।
म्हणौनि , जैसा असे तैसया । मातें, नेणोनि धनंजया ! ।
वेदु जाणो गेला , तंव तया । जालिया शाखा ।।432।।
तरी , तिही शाखाभेदी , । मीचि जाणिजे त्रिशुद्धी ।
जैसा , पूर्वापरा नदी , । समुद्रचि ठी [1] ।।433।। — 1 शेवट
आणि , महासिद्धांतापासी [2] । श्रुति हारपती शब्देसी , । — 2 ब्रह्मापाशी
जैसिया , सगंधा आकाशी । वातलहरी ।।434।।
तैसे , समस्तही श्रुतिजात । ठाके लाजिले ऐसे निवांत , ।
ते मीचि करी यथावत । प्रकटोनियां ।।435।।
पाठी , श्रुतिसहित अशेष , । जग हारपे जेथ निःशेष , ।
ते निजज्ञानही चोख , । जाणता मीचि ।।436।।
जैसे,निदेलिया जागिजे,। तेव्हां स्वप्नीचे कीर [3] नाही दुजें , । — 3 खरोखर
परी , एकत्वही देखो पाविजे । आपलेचि ।।437।।
तैसे आपले अद्वयपण , । मी जाणतसे दुजेंनवीण ।
तयाही बोधाकारण । जाणता मीचि ।।438।।
मग आगी लागलिया कापुरा , । ना काजळी ना वैश्वानरा ।
उरणे नाही , वीरा ! । जयापरी ।।439।।
तेवी , समूळ अविद्या खाये , । ते ज्ञानही जै बुडोनि जाये , ।
तऱ्हीं नाही कीर नोहे । आणि , न साहे , असणेही ।।440।।
पै,विश्व घेऊनि गेला मागेसी[4],। तया चोराते कवण,के गिवसी [5] ?। — 4 मागासकट 5 शोधावा
जे कोणी एकी दशा ऐसी । शुद्ध , ते मी ।।441।।
ऐसी,जडाजडव्याप्ती [5] । रूप करिता कैवल्यपती । — 5 दृश्य व अदृश्य यांच्या
ठी केली [6] निरुपहिती [7] । आपुल्या रुपी ।।442।। — सकट 6 शेवट केला
तो आघवाचि बोधु सहसा [8] । अर्जुनी उमटला कैसा ! । — 7 उपाधीरहित 8 चटकन
व्योमीचा चंद्रोदयो जैसा , । क्षीरार्णवी ।।443।।
कां , प्रतिभिंती चोखटे । समोरील चित्र उमटे ।
तैसा , अर्जुने आणि वैकुंठे , । नांदतसे बोधु ।।444।।
तरी बाप [9]! वस्तुस्वभावो [10]। फावे [11],तंव,तंव,गोडिये थांवो[12] । — 9 धन्य आहें
म्हणौनि , अनुभवियांचा रावो । अर्जुन म्हणे ।।445।। — 10 ब्रह्मभाव 11 मिळते
" जी व्यापकपण बोलतां , । निरुपाधिक जे आतां । — 12 गोडी वाढते
स्वरूप , प्रसंगता । बोलिले देवो , ।।446।।

ते , एक वेळ अव्यंगवाणे [1] । कींजो कां मजकारणे '' । 1 पूर्णपणे
तेथ द्वारकेचा नाथु म्हणे , ।' भले केले ।।447।।
पै , अर्जुना ! आम्हाहि वाडेकोडे [2] । अखंड बोलो आवडे , । 2 मोठया कौतुकाने
परी काय कींजे , न जोडे । पुसते ऐसे ।।448।।
आजि मनोरथांसि फळ । जोडलासि तूं केवळ , ।
जे तोंड भरूनि निखळ [3] । आलासि पुसो ।।449।। 3 शुद्ध
जे अद्वैताहीवरी भोगिजे । ते अनुभवीच तूं विरजे [4] । 4 मदत करतोस
पुसोनि मज माझे । देतासि सुख ।।+450।।
जैसा आरिसा आलिया जवळां , । दिसे आपणपें आपला डोळा ,।
तैसा , संवादिया तूं निर्मळा । शिरोमणी ।।451।।
तुवां , नेणोनि पुसावे , । मग आम्ही परिसऊं बैसावे ।
तो , गा ! हा पाडु [5] नव्हे , । सोयरेया ! '' ।।452।। 5 प्रकार
ऐसे म्हणौनि आलिंगिले । कृपादृष्टी अवलोकिले ।
मग देवो काय बोलिले । अर्जुनेसी ! ।।453।।
'' पै , दोही वोठी एक बोलणे , । दोही चरणी एक चालणे , ।
तैसे , पुसणे सांगणे । तुझें माझे ।।454।।
एवं , आम्ही तुम्ही येथे । देखावे , एका अर्थाते ।
सांगते , पुसते येथे । दोन्ही एक ।।455।।
ऐसा बोलत देवो भुलला मोहे , । अर्जुनाते आलिंगुनि ठाये ।
मग बिहाला [6] , म्हणे '' नोहे ! । आवडी हें '' ।।456।। 6 भिती वाटली
जाले इक्षुरसाचे ढाळ [7] । तरी , लवण देणे किडाळ [8] । 7 ढेप तयार झाली 8 चूक
जे , संवादसुखाचे रसाळ , । नासेल थिते [9] ।।457।। 9 जवळचे
आधीच आम्हा , यया काही । नरनारायणासी भिन्न नाही , ।
परी आतां जिरो माझ्या ठाई । वेगु हा माझा ।।458।।
इया बुद्धी सहसा [10] , । श्रीकृष्ण म्हणे '' वीरेशा ! । 10 एकदम
पै , गा ! तो तुवां कैसा । प्रश्नु केला ? ।।459।।
जो अर्जुन श्रीकृष्णी विरत होता , । तो परतोनि मागुता , ।
प्रश्नावळीची कथा , । ऐको आला ।।460।।
तेथ , सद्गदे बोले । अर्जुने '' जी , जी , '' म्हणितले ।
निरुपाधिक आपुले । रुप सांगा '' ।।461।।
यया बोला शाङर्गी । तेचि सांगावयालागी , ।
उपाधी दोही भागी । निरुपीत असे ।।462।।
पुसिलिया निरुपहित , । उपाधि कां सांगे येथ ? ।
हें कोण्हाही प्रस्तुत [11] । गमे जरी , ।।463।। 11 व्यख्यानाचा विषय

तरी , ताकाचे अंश फेडणे , । याची नांव लोणी काढणे ; ।
चोखाचिये शुद्धी , तोडणे । किडचि जेवी ।।464।।
बाबुळीचि सारावी हाते , । परी , पाणी तंव असे आइते , ।
अभ्रचि जावे , गगन तें । सिद्धचि कीं ।।465।।
वरील कोंडियाचा गुंडाळा । झाडूनि केलिया वेगळा , ।
कणु घेतां , विरंगोळा [1] । असे काई ? ।।466।।
तैसा , उपाधि, उपाहितां । शेवटु जेथ , विचारितां ।
ते कोणातेही न पुसतां , । निरुपाधिक ।।467।।
**जैसे न सांगणेवरी , । बाळा [2] , पतीसी रूप करी , ।**
**बोल निमालेपणे [3] विवरी [4] , । अचर्चाते [5] ।।+468।।**
पै , सांगणेया जोगे नव्हे , । तेथिचे सांगणे ऐसे आहें , ।
म्हणौनि , उपाधि लक्ष्मीनाहे । बोलिजें आदी ।।469।।
**पाडिव्याची चंद्ररेखा , । निरुती दावावया , शाखा ।**
**दाविजे , तेवी , औपाधिका । बोली इया ।।470।।**

1 हरकत
2 नवीन नवरी
3 बोलणे थांबल्यावर 4 विवरण करता 5 चर्चा करिता येत नाही असे

**द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ।**
**क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यतें ।।16।।**

**या लोकात 'क्षर' आणि'अक्षर' हें दोन पुरुष आहेंत. क्षर म्हणजे सर्व नाशवंत भूते आणि कूटस्थ म्हणजे या सर्व भूतांच्या मुळाशी (कुटाशी) असणारे जे प्रकृतिरूप अव्यक्त तत्त्व त्यास अक्षर असे म्हणतात.**

मग तो म्हणे,'' गा सव्यसाची ! ।पै,इये संसारपाटणीची [4] ।
वस्ती साविया [5] टांची [6] । दुपुरुषी [7] ।।471।।
जैसी , आघवांचि गगनी , । नांदत दिवोरात्री दोन्ही , ।
तैसे , संसार राजधानी , । दोन्हीचि हें ।।472।।
आणिकही तिजा पुरुष आहें ,। परी,तो या दोहींचे नांव न साहे , ।
जो उदेला , गांवेसी खाये । दोहीतें ययां ।।473।।
परी ते तंव गोठी असो ; । आधी दोन्हीची हें परियेसों ।
जें संसारग्रामा वसो । आले असती ।।474।।
एक आंधळा,वेडा,पंगु । येर , सर्वांगे पुरता चांगु , ।
परी ग्रामगुणे [7] संगु । घडला दोघां ।।475।।
तया एका नाम क्षरु । येरातें म्हणती अक्षरु ।
इही दोहीचि परी , संसारु । कोंदला असे ।।476।।
आतां , क्षरु तो कवणु ? । अक्षरु तो किं लक्षणु ?।
हा अभिप्रायो संपूर्णु । विवंचू गा ! ।।477।।

4 संसाररुपी शहरात
5 सर्वमिळून 5 थोडी 6 दोन पुरुषांची
7 एका गावात राहण्याचा योग

तरी महदहंकारा-। लागुनिया धनुर्धरा ! ।
तृणांतीचा पांगोरा-। वरी [1] पै गा ! ।।478।।    1 बारीक मुळापर्यंत
जे काही साने थोर , । चालते अथवा स्थिर , ।
किंबहुना गोचर । मनबुद्धीसि जे , ।।479।।
जेतुले पांचभौतिक [2] घडते । जे नामरूपा सांपडते ।    2 शरीर
गुणत्रयाच्या पडते । कामठां [3]जे ।।480।।    3 व्यापार
भूताकृतीचे नाणे । घडत , भांगारे [4] जेणे , ।    4 सोने
काळासि जूं [5] खेळणे । जिही कवडां [6] ।।481।।    5 जुगार 6 पैसा
जाणणेचि विपरिते , । जें , जें , काही जाणिजेंते , ।
जें प्रतिक्षणी निमते [7]। होऊनियां ।।482।।    7 नाहीसे होतें
अगा ! काढूनि भ्रांतीचे दांग [8] । उभवी सृष्टीचे आंग ।    8 अरण्यातील वाळकीं
हें असो बहु ; जग । जया नाम , ।।483।।    लाकडे
पै , अष्टधा भिन्न ऐसे , । जें दाविले प्रकृतिमिसे , ।
जें क्षेत्रद्वारां छत्तिसे । भागी केले , ।।484।।
हें मागील सांगो किती ! । अगा , आतांचि जें प्रस्तुती ।
वृक्षाकार रूपाकृती । निरूपिले ।।485।।
तें आघवेचि साकारे । कल्पुनी आपणपयां , पुरे [9] , ।    9 गाव
जाले असे तदनुसारे । चैतन्यचि ।।486।।
जैसा,कुहां [10] आपणचि बिंबे ।सिंह, प्रतिबिंब पाहतां क्षोभे,।    10 विहीर
मग , क्षोभला , समारंभे [11] । घाली तेंथ ।।487।।    11 आवेशाने
कां , सलिली असतचि असे , । व्योमावरी व्योम बिंबे जैसे , ।
अद्वैत होऊनि , तैसे । द्वैत घेपे ।। +488।।
अर्जुना गा ! यापरी। साकार कल्पुनि पुरी ।
आत्मा विस्मृतीचि करी । निद्रा तेंथ ।।489।।
पै,स्वप्नी सेजार [12] देखिजें,। मग पहुडणे जेसे तेंथ कींजे , ।    12 बिछाना
तैसे पुरी , शयन देखिजे । आत्मयासी ।।490।।
पाठी,तिये निद्रेचेनि भरे,। मी सुखी,दुःखी म्हणत,घोरे [13] ।    13 मी सुखी,मी दुःखी असे
अहंममतेचेनि थोरे [14] । वोसणाये [15] सादे [16] ।।491 ।।    घोरतो 14 मोठ्या अहंभावने
हा जनकु , हें माता । हा मी गौर [17] , हीन [18] पुरता ।    15 बरळतो 16 शब्दांनी
पुत्र , वित्त , कांता , । माझे हें ना ! ।।492।।    17 गोरा 18 दीन दुबळा
ऐसिया वेंघोनि [19] स्वप्ना , । धांवत भवस्वर्गाचिया राना , ।    19 स्वार होऊन
तया चैतन्या नाम , अर्जुना ! । क्षर पुरुष गा ! ।।493।।
आतां , ऐक , क्षेत्रज्ञु येणे । नामे , जयातें बोलणे , ।
जग जीवु कां म्हणे , । जिये दशोतें ।।494।।

जो आपुलेनि विसरे , । सर्व भूतत्वें अनुकरे [1] ।
तो आत्मा बोलिजें क्षरे । पुरुष नामे ।।495।।
जें , तो वस्तुस्थिती पुरता [2] । म्हणौनि आली पुरुषता ।
वरी , देहपुरी निदैजता [3] । पुरुषनामे ।।496।।
आणि क्षरपणाचा नाथिला [4] । आळु यया ऐसेनि आला , ।
जें , उपाधीचि आतला [5] , । म्हणौनिया ।। 497।।
जैसी , खळाळीचिया उदका-। सरसी , आंदोळे चंद्रिका , ।
तैसा , विकारां औपाधिका [6] । ऐसाचि गमे ।।498।।
कां , खळाळु मोटका शोषे , । आणि चंद्रिका तै सरिसीच भ्रंशे , ।
तैसा , उपाधिनाशी न दिसे । उपाधिकु ।।499।।
ऐसे उपाधीचेनि पाडे , । क्षणिकत्व यातें जोडे , ।
तेंणे खोकरपणे [7] घडे । क्षर हें नाम ।।500।।
एवं , जीवचैतन्य आघवे । हें , क्षर पुरुष जाणावे ।
आतां रूप करूं बरवें । अक्षरासी ।।501।।
तरी अक्षरु जो दुसरा । पुरुष , पै , धनुर्धरा ! ।
तो मध्यस्थु गा गिरिवरां । मेरु जैसा ।।+502।।
जें , तो पृथ्वी ,पाताळ , स्वर्गी । इही , न भेदे तिही भागी , ।
तैसा , दोही ज्ञानाज्ञानांगी [8] । पडेना जो ।। 503।।
ना , यथार्थज्ञाने एक होणे , । ना , अन्यथात्वे दुजें घेणे , ।
ऐसे निखिळ जें नेणणे , । तेचि तें रूप ।।+504।।
पांसुता [9] निःशेष जाये , । ना घटभांडादि होये ।
तया मृत्पिंडा ऐसे आहें , । मध्यस्थ जें ।। 505।।
पै , आटोनि गेलिया सागरु , । मग तरंगु ना नीरु , ।
तया ऐशी अनाकारु । जें दशा गा ! ।।506।।
पार्था ! जागणे तरी बुडे , । परी स्वप्नाचे कांही न मांडे ।
तैसिये निद्रे सांगडे [10] । न्याहाळणे जें ।।507।।
विश्व आघवेचि मावळे , । आणि , आत्मबोधु तरी नुजळे [11] ।
तिये अज्ञानदशे केवळे , । अक्षरु नाम ।।508।।
सर्वा कळी सांडिले जैसे , । चंद्रपण उरे अंवसे , ।
रुप जाणावे तैसे , । अक्षराचे ।।509।।
पै , सर्वोपाधिविनाशे , । हें जीवदशा जेंथ पैसे [12] , ।
फळपाकांत [13] जैसे । झाड बीजी ।।510।।
तैसे , उपाधी , उपहीत । थोकोनि ठाके [14] जेंथ , ।
तयातें अव्यक्त । बोलती गा ! ।।511।।

1 भूतरुपाने नांदतो
2 ब्रह्मरुपाने पूर्ण
3 झोपणारा
4 खोटा
5 उपाधीकृत
6 उपाधीसंबंधाने
7 फुटकेपणामुळे
8 यथार्थ व अन्यथा ज्ञान
9 मातीपणा
10 सारखे
11 प्रकाशीत होत नाही
12 प्रवेश करतें
13 पक्व फळात
14 थांबून स्थिर होतें

घन अज्ञान सुषुप्ती , । तो ,'' बीजभावो '' म्हणती ।
येर , स्वप्न, हन जागृती । फळभावो तयाचा ।।512।।
जयासी कां बीजभावो । वेदांती केला ऐसा आवो [1] ।
तो तया पुरषा ठावो [2] । अक्षराचा ।।513।।
जेंथूनि , अन्यथाज्ञान । फाकोनि , जागृति , स्वप्न , ।
नानाबुद्धीचे [3] रान , । रिगाले असे , ।।514।।
जीवत्व जेंथूनि किरीटी ! । विश्व , उठतचि उठी [4] , ।
तें उभय भेदांची मिठी [5] । अक्षरु पुरुषु ।।515।।
येरु क्षर पुरुष कां , जनी । जिही खेळे जागृती , स्वप्नी , ।
तिया अवस्था जो दोन्ही । वियाला [6] गा ! ।।516।।
पै , अज्ञानघनसुषुप्ती , । ऐसैसी जें कां ख्याती ।
या उणी [7] एकीं प्राप्ती । ब्रह्माची जें ।।517।।
साचचि पुढती वीरा ! । जरी न येतां स्वप्न जागरा , ।
तरी ब्रह्मभावो साचोकारा [8] । म्हणो येता ! ।।518।।
परी प्रकृतिपुरुषे , दोनी । अभ्रे , जाली जिये गगनी , ।
क्षेत्रक्षेत्रज्ञु स्वप्नी । देखिला जिये , ।।519।।
हें असो ; अधोशाखा । या संसाररूपा रुखा , ।
मूळ तें रूप पुरुषा । अक्षराचे ।।520।।
हा पुरुष कां म्हणिजें ? । जें पूर्णपणेचि निजे , ।
पै , मायापुरी पहुडिजें , । तेंणेहि बोले ।।521।।
आणि , विकारांची जें वारी [9] , । तें विपरीत ज्ञानाची परी [10] , ।
नेणिजें , जिये माझारी । तें सुषुप्ती गा हा ।।522।।
म्हणौनि , यया आपैसे [11] । क्षरणे [12] या नसे ।
आणिकेही हा न नाशे । ज्ञानाउणे [13] ।।523।।
यालागी हा अक्षरु । ऐसा वेदांती डगरु [14] ।
केला , देशी थोरु । सिद्धांताच्या।।524।।
ऐसे जीवकार्य कारण , । जया मायासंगुचि लक्षण ।
अक्षर पुरुषु जाण । चैतन्य तें ।।525।।

1 प्रतिष्ठा दिली
2 आश्रय स्थान
3 अन्यथाबुद्धीचे
4 विश्व तयार होतें
5 मिलाफ
6 उत्पन्न करतो
7 या एका गोष्टी वाचून जी ब्रह्माची प्राप्ती
8 खरोखर
9 फेरी 10 प्रकार
11 स्वभावतःच 12 गळणे
13 ज्ञानावाचून
14 प्रसिद्ध

**उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।**
**यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ।।17।।**

**परंतु जो पुरुष उत्तम तो या दोहीकडुन भिन्न आहें . त्याला परमात्मा असे म्हणतात. तो अव्यय ईश्वर त्रैलोक्यात भरलेला असून त्रैलोक्याचे पोषण करितो .**

आतां , अन्यथाज्ञानी । या दोनी अवस्था [1] जया जनी [2] ।
तया हरपती , घनी । अज्ञानतत्त्वी ।।526।।
तें अज्ञान ज्ञानी बुडालिया , । ज्ञाने कीर्तिमुखत्व [3] केलिया ।
जैसा , वन्हि काष्ठ जाळूनिया । स्वये जळे , ।।527।।
तैसे , अज्ञान ज्ञाने नेले । आपण वस्तु देऊनि गेले ।
ऐसे जाणणेनिवीण उरले । जाणतें जें , ।।528।।
तें, तो गा ! उत्तम पुरुषु । जो , तृतीय कां निष्कर्षु [4] ।
दोहीहून आणिकु । मागिला [5] जो ।।529।।
सुषुप्ती आणि स्वप्ना-। पासूनि बहुवे , अर्जुना ! ।
जागणे जैसे आना , । बोधाचेचि ।।530।।
कां , रश्मी हन मृगजळा-। पासूनि अर्कमंडळा ।
अफाटु [6] , तेवी वेगळा । उत्तमु गा ! ।।531।।
हें ना , काष्ठीचा काष्ठाहुनी । अनारिसा जैसा वन्ही , ।
तैसा , क्षराक्षरापासुनी । आनचि तो ।।532।।
पै , ग्रासूनि आपली मर्यादा , । एक करीत नदीनदां , ।
ऊठी कल्पांती उदावादा [7] । एकार्णवाचा [8] ।।533।।
तैसे , स्वप्न ना सुषुप्ती , । ना जागराची [9] गोठी आथी , ।
जैसी , गिळिली दिवोराती । प्रळयतेंजें ।।534।।
मग , एकपण ना दुजे , । असे नाही , हें नेणिजें ।
अनुभवु निर्बुजें [10] । बुडाला, जेथे ।।535।।
ऐसे आथि जें कांही , । तें , तो उत्तम पुरुषु पाही , ।
जें परमात्मा इही । बोलिजें नामी ।।536।।
तेही एथ न मिसळतां । बोलणे जीवत्वें , पंडुसुतां ! ।
जैसी , बुडणेयाची वार्ता , । थडियेचा [11] कींजें ।।
तैसे , विवेकाचिये कांठी । उभे ठाकलिया , किरीटी ! ।
परावराचिया [12] गोठी , ।करणे वेदां।।538।।
म्हणौनि , पुरुषु , क्षराक्षरु , । दोन्ही देखोनि अवरु [13] ।
यातें म्हणती परु । आत्मरुप ।।539।।
अर्जुना ! ऐसिया परी । परमात्मा शब्दवरी [14] ।
सूचिजें [15] गा ! अवधारी । पुरुषोत्तमु ।।540।।
एऱ्हवी,न बोलणेचि,बोलणे,। जेथिंचे सर्व नेणिवा,जाणणे ।
कांहीच न होनि , होणे । जें वस्तु गा ! ।।+541।।
सोऽहं,तेही अस्तवले [16] । जेंथ सांगतेचि [17] सांगणे जाले,।
द्रष्टत्वेसी गेले । दृश्य जेंथ ।।542।।

1 जागृत स्वप्नरूप अवस्था
2 लोकांत
3 सन्मुखत्व
4 शेवट
5 मागच्या दोहीहून पूर्वीचा
6 खूप
7 प्रकटपणा 8 सागर
9 जागृती
10 गोंधळून
11 काठावरचा
12 पलिकडच्या व अलीकडच्या
13 अलिकडील
14 शब्दाच्या मर्यादेपर्यंत
15 ओळखणे
16 नाहीसे झाले
17 सांगणाराच

आतां,बिंबा आणि प्रतिबिंबा-।माजी, कैची हें म्हणो नये प्रभा ।
जऱ्ही कैसेनि हे लाभा । जायेचि ना ।।+543।।
कां , घ्राणा [1] फुला दोही , । द्रुती असे जें माझारिलां ठायी । 1 नाक
तें न दिसे , तरी नाही । ऐसे बोलो नये ।।544।।
तैसे , द्रष्टा दृष्य हें जाये । मग कोण म्हणे काय आहें ? ।
हेचि अनुभवे , तेचि पाहे । रुप तया ।।545।।
जो प्रकाश्येवीण [2] प्रकाशु,। जो,ईशितव्येवीण [3] ईशु [4] । 2 प्रकाशीत होण्यासारखा नसून
आपणेनीचि अवकाशु । वसवीत असे जो ।।546।। प्रकाश आहे 3 नियम्य नसून
जो नादे ऐकिजता नादु , । स्वादे चाखिजता स्वादु , । 4 नियामक
जो भोगिजतसे आनंदु । आनंदेचि ।।547।।
जो पूर्णतेचा परिणामु । पुरुष गा पुरुषोत्तमु ।
विश्रांतीचाही विश्रामु । विराला [5] जेंथ ।।548।। 5 नाहीसा झाला
सुखासि सुख जोडिले । जें तेंज तेजासि सांपडले ।
शून्यही [6] बुडाले । महाशुन्यी [7] जिये ।।549।। 6 आकाशादिशून्य 7 ब्रह्मी
जो विकासाहीवरी उरता [8] , । ग्रासातेही ग्रासूनि पुरता । 8 विस्ताराला व्यापून
जो बहुतें पाडे बहुता-। पासूनि बहु ।।550।। उरला आहे
पै , नेणतयाप्रती , । रुपेपणाची प्रतीती ।
रुपे न होनि , शुक्ती । दावी जेवी ।।551।।
कां , नाना अलंकारदशे । सोने , न लपत लपाले असे , ।
विश्व न होनियां , तैसे । विश्व जो धरी, ।।552।।
हें असो ; जलतरंगा । नाही सिनानेपण जेवी गा ! ।
तेवी , दिसता , प्रकाशु जगा । आपणचि जो ।।553।।
आपलिया संकोचविकाशा [9] । आपणचि रूप वीरेशा । 9 आकुंचन व विस्तार
हा जळी चंद्र हन जैसा । समग्र गा ।।554।।
तैसा , विश्वपणे कांही होये , । विश्वलोपी कही न जाये , ।
जैसा , रात्री दिवसे नोहे । द्विधा रवि ।।555।।
तैसा , काहीचि कोणीकडे । कायिसेनिहि वेची न पडे [10] । 10 नाश पावत नाही
जयाचे सांगडे [11] । जयासीचि । 556।। 11 तुलना

**यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ।**
**अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ।।18।।**

**ज्या अर्थी मी क्षराच्याही पलीकडचा व अक्षराहूनही उत्तम पुरुष आहे , त्या अर्थी लोकव्यवहारांत आणि वेदामध्येहि पुरुषोत्तम या नांवाने मी प्रसिद्ध आहे .**

जो आपणपेचि आपणया । प्रकाशीतसे , धनंजया ! ।
काय बहु बोलो ! जया । नाही दुजें ।।557।।
तो गा ! मी निरुपाधिकु । क्षराक्षरोत्तमु एकु ।
म्हणोनि ,म्हणे वेद लोकु । पुरुषोत्तमु ।।558।।

**यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम्।**
**स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ।।19।।**
**याप्रमाणे मी पुरुषोत्तम हें मोह न पावतां जो जाणितो, तो सर्वज्ञ होत्साता सर्वभावेकरून हे भारता! मलाच भजतो .**

परी हें असो ; ऐसिया । मज पुरुषोत्तमातें धनंजया ! ।
जाणे , जो पाहलेया । ज्ञानमित्रे [1] ।।559।। — 1 ज्ञानरूपी सूर्याचा उदय झाल्यावर
चेइलिया [2] आपुले ज्ञान , । जैसे , नाहीचि होय स्वप्न , । — 2 जागे झाल्यावर
तैसे , स्फुरतें [3] त्रिभुवन । वावो जाले [4] ।।560।। — 3 स्फुरण होणारे 4 मिथ्या झाले
कां,हाती घेतलिया माळा,। फिटे सर्पाभासाचा कांटाळा [5] । — 5 रोमांच
तैसा , माझेनि बोधे , टवाळा [6] । नागवे [7] तो ।।561।। — 6 खोटे 7 असाध्य असते
लेणे सोनेचि जो जाणे , । तो लेणेपण तें वावो म्हणे ।
तेवी , मी जाणोनि जेंणे । वाळिला भेदु [8] ।।562।। — 8 सगळे जग एकरुप पाहिले
मग म्हणे, '' सर्वत्र सच्चिदानंदु । मीचि एकु स्वतःसिद्धु ''।
जो, आपणेनसी भेदु । नेणोनिया जाणे ।।563।।
तेंणेचि सर्व जाणितले , । हेही म्हणणे थेकुले [10] । — 10 अल्प
जें , तया सर्व उरले । द्वैत नाही ।।564।।
म्हणौनि , माझिया भजना । उचितु तोचि अर्जुना ! ।
गगन जैसे आलिंगना । गगनाचिया ।।565।।
क्षीरसागरा परगुणे [11] । कींजें , क्षीरसागरचिपणे । — 11 पाहुणाचार
अमृतचि होऊनि मिळणे । अमृती जेवी ।।566।।
साडेपंधरा [12] मिसळावे । तै , साडेपंधरेचि होआवे , । — 12 शुद्ध सोने
तेवी , मी जालिया संभवे । भक्ति माझी ।।+567।।
हां , गा ! सिंधूसि आनी होती , । तरी गंगा कैसेनि मिळती ? ।
म्हणौनि , मी न होतां , भक्ती-। अन्वयो [13] आहें ।।568।। — 13 संबंध
ऐसियालागी सर्व प्रकारी । जैसा कल्लोळु अनन्यु सागरी , ।
तैसा , मातें अवधारी । भजिन्नला जो ।।569।।
सूर्या आणि प्रभे । एकवंकीं [14] जेणे लोभे [15] । — 14 ऐक्य 15 ज्या लोभाने
तो पाडु मानूं लाभे । भजना तया ।।570।।

**इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयाऽनघ ।**
**एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ।।20।।**

**हें निष्पाप भारता ! असे हें गुह्यांतले गुह्य शास्त्र मी सांगितले. हें समजुन घेतल्याने मनुष्य बुद्धिमान म्हणजें बुद्ध किंवा जाणता आणि कृतकृत्य होईल.**

एवं कथिलयादारभ्य [1] । हें जें सर्व शास्त्रैकलभ्य [2]।
उपनिषदां सौरभ्य [3] । कमळदळां जेवी ।।+571।।
हें शब्दब्रह्माचे मथितें [4] । श्रीव्यासप्रज्ञेचेनि हातें ।
मथूनि काढिले आयितें । सार आम्ही ।।572।।
जें ज्ञानामृताचि जान्हवी , । जें आनंदचंद्रीची सतरावी [5] ।
विचारक्षीरार्णवीची नवी । लक्ष्मी जें हें ।।573।।
म्हणौनि,आपुलेनि [6] पदे वर्णे,। अर्थाचेनि जीवेप्राणे,।
मीवांचोनि [7] , हो नेणे । आन कांही ।।574।।
क्षराक्षरत्वे समोर जाले । तयांचे पुरुषत्व वाळिले [8] ।
मग सर्वस्व मज दिधले । पुरुषोत्तमी ।।575।।
म्हणौनि , जगी गीता । मियां आत्मेनि पतिव्रता ।
जें हें प्रस्तुत तुवां आतां । आकर्णिली ।।576।।
साचचि,बोलाचे नव्हे हें शास्त्र,।पै,संसारु जिणते [9] हें शस्त्र ।
आत्मा अवतरवितें मंत्र । अक्षरे इये ।।577।।
परी तुजपुढां सांगितले । तें अर्जुना ऐसे जाले , ।
जें गौप्यधन काढिले । माझे आजि ।।578।।
मज चैतन्यशंभूचा माथां । जो निक्षेपु [10] होता पार्था ! ।
तया गौतमु जालासि आस्था-। निधी तूं गा ! ।।579।।
चोखटिवा [11] आपुलिया । पुढिला उगाणा [12] घेयावया ।
तया दर्पणाचीचि परी धनंजया ! । केली आम्हां ।।580।।
कां,भरले चंद्रतारांगणी । नभ,सिंधू आपणयामाजी आणी ।
तैसा,गीतेसी मी अंतःकरणी । सूदला [13] तुवां ।।581।।
जें त्रिविधमळिकटा [14] । तूं सांडिलासि सुभटा ।
म्हणौनि,गीतेसी मज वसौटा [15] । जालासि गा ! ।।582।।
परी हें बोलो काय ! गीता , । जें हें माझी उन्मेषलता [16] ।
जाणे , तो समस्ता । मोहा मुके ।।583।।
सेविली अमृतसरिता, । रोगु दवडूनि पंडुसुता ! ।
अमरपण उचितां । देऊनि घाली ।।584।।
तैसी , गीता हे जाणितलिया । काय विस्मयो मोह जावया ? ।
परी आत्मज्ञाने आपणपयां । मिळिजें येथ ।।585।।

1 सांगावयास आरंभ केल्यापासून
2 सर्व शास्त्रांतील सिद्धांच्या एकरुपतेने 3 सुवास
4 मंथन केलेले 5 व्योम चंद्रातील आनंदरुपी चंद्रकला
6 गीतेच्या
7 मद्रुपच होते
8 नाहीसे केले
9 जिंकणारे
10 ज्ञानगंगारुप ठेवा
11 स्वच्छपणाने 12 झाडा घेण्यास
13 साठवून ठेवलास
14 आध्यात्मीक, आधिभैतिक व आधिदेविक दोष 15 आश्रयस्थान
16 ज्ञानवल्ली

जया आत्मज्ञानाच्या ठायी , । कर्म अपुलेया जीविता [1] पाही , । 1 आयुष्य
होऊनियां उतराई । लया जाय ।।586।।
हरपले दाऊनि जैसा , । मागु [2] सरे वीरविलासा ! । 2 शोध
ज्ञानचि कळस वळघे तैसा । कर्मप्रासादाचा ।।587।।
म्हणौनि , ज्ञानिया पुरुषा । कृत्य करूं सरले देखा ।
ऐसा अनाथांचा सखा । बोलिला तो ।।588।।
तें श्रीकृष्णवचनामृत । पार्थी भरोनि असे वोसंडत [3] । 3 भरुन सांडणे
मग , व्यासकृपा , प्राप्त । संजयासी ।।589।।
तो , धृतराष्ट्र राया । सूतसे [4] पान करावया । 4 देत असे
म्हणौनि , जीवितांतु [5] तया । नोहेचि भारी ।।+590।। 5 अंतसमय
एऱ्हवी , गीताश्रवण अवसरी , । आवडो लागता [6] अनधिकारी , । 6 चांगली वाटली
परि , सेखी [7] , तेचि उजरी [8] । पातला भली ।।+591।। 7 शेवटी 8 उत्कर्ष
जेव्हां , द्राक्षी दूध घातले , । तेव्हां वायां गेले गमले , ।
परी फळपाकीं दुणावले । देखिजें , जेवी ।।592।।
तैसी , श्रीहरीवक्त्रींची अक्षरे । संजये सांगितली आदरे , ।
तिही अंधु , तोही अवसरे [9] । सुखिया जाला ।।593।। 9 योग्य वेळी
तेचि , मऱ्हाटेनि विन्यासे [10] । मिया उन्मेषे ठसेठोंबसे [11] । 10 निरुपणाने
जी जाणे , नेणे , तैसे । निरोपिले ।।594।। 11 कौतुकाने ओबडधोबड
सेवंतीये , अरिसि[12] , कांही । आंग पाहता , विशेषु नाही । 12 अरसिकाला
परी सौरभ्य नेले तिही । भ्रमरी जाणिजें ।।+595।।
तैसे , घडतें प्रमेय घेइजें । उणे तें मज देइजें।
जें नेणणे , हेचि सहजें । रुप कीं बाळा ।।596।।
तरी नेणतें जऱ्ही होये । तऱ्ही देखोनि बाप कीं माये , ।
हर्ष केही न समाये । चोज [13] करिती ।।597।। 13 कौतुक
तैसे संत माहेर माझे । तुम्ही मिनलिया मी लाडैजे ।
तेचि ग्रंथाचेनि व्याजें । जाणिजो जी ।।598।।
आता , विश्वात्मकु हा माझा । स्वामी श्रीनिवृत्तिराजा ।
तो अवधारु वाक्पूजा । ज्ञानदेवो म्हणे ।।599।।

**इति श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे पुरुषोत्तमयोगो नाम पंचदशोऽ ध्यायः ।।15।।**

## कठीण ओव्यांचा अर्थ

1. आतां हें आपले हृदय शुद्ध करून त्या हृदयरूपी चौरंगावरच श्रीगुरुचरणांची स्थापना करु.
2. नंतर ब्रह्मात्मैक्य निश्चयरूपी ओंजळीत सर्वेंद्रियरूपी फुलांच्या कळ्या भरून त्या पुष्पांजलीचे श्रीगुरुस अर्ध्य देऊ
3. अनन्य भावरूपी स्वच्छ पाण्याने श्रीगुरुचरणांस स्नान घालून त्याच्याच ठिकाणी असणाऱ्या एकनिष्ठ वासनारूप चंदनाचे श्रीगुरुस अनामिका बोटाने गंध लावू .
4. प्रेमरूपी सोन्याची नुपूरे चांगली घासून, स्वच्छ करून ती श्रीगुरुंच्या सुकुमार पायांस घालु
5. अव्यभिचारित्वामुळे शुद्ध असलेली श्रीगुरुविषयक एकनिष्ठ प्रेमलक्षणाची जी भरीव आवड तीच सर्वोत्तम दृढ आवडीची जोडवी, श्रीगुरुंच्या पायांच्या बोटामध्ये घालु
6. आनंदरूपी सुवासाच्या भराने युक्त अशी अष्टसात्विक भावरूपी आठ पाकळ्यांचे उमललेले कमळ श्रीगुरुंच्या चरणावर वाहु
7. तेथ अहं अशा स्वरूपाचा सुगंधी धूप सदा जाळू आणि अनात्मा जीव मी नाही अशा तेंजाने ओवाळु आणि श्रीगुरुंच्या ब्रह्मभावास ऐक्य पावून त्या ऐक्यभावानेच श्रीगुरुंना आलिंगन देऊ
8. माझे शरीर व प्राण या दोघांच्या दोन पादुका करून श्रीगुरुंच्या श्रीचरणामध्ये घालू व श्रीगुरुचरणांवरून ऐहिक, पारत्रिक भोग व तत्सापेक्ष मोक्ष यांचे निंबलोण ओवाळून टाकु
9. या श्रीगुरुचरण सेवेने सेवक अशा भाग्यास प्राप्त होतो कीं, ज्या भाग्याने धर्म व मोक्षासकट सर्व अर्थाची प्राप्ती होऊन सर्वांत सत्ताधारित्वाचे मुख्य पद तो निर्माण करतो
74. तंतुवाद्यापासून उत्पन्न होऊन कानाला विषय होऊन ऐकु येणाऱ्या नादाच्या पूर्वीचा जो मूळ नाद म्हणजें ते ब्रह्म आहें . तसेच नाकाला विषय न होणाऱ्या सुगंधाच्या मूळचा जो मकरंद-सुगंध किंवा जो विषय सेवनाशिवाय भोग्य साधन निरपेक्ष असलेला, मूर्तिमंत सोलीव स्वरुपानंद ब्रह्म आहें
75. जें अलीकडे व पलीकडे पुढे व मागे अशा मर्यादेविना सर्वव्यापक आहे व जे पहाणारावाचून जे पाहणे म्हणजें स्वयंप्रकाश आहें आणि जें अदृश्य-सर्वप्रमाणास अविषय आहें ,
76. ज्या ब्रह्माच्या ठिकाणी मायारूप कल्पित उपाधीचा आध्यात्मिक संबंध मानिला असता नामरूपादि प्रपंचाचा विस्तार व्यवहार होतो तें ब्रह्म होय

267 त्यानन्तर जेंथे ' इदंता' म्हणजें 'इदं' सफूरण नाही म्हणजें इदं प्रतीचा आत्मा विषय नाही अतएव इदं स्फूरण सापेक्ष ' अहं' स्फूरणही जेंथे नाही अर्थात ' अहं-इदं ' अशा उभयविध वृत्तींनी रहित नित्य उपलब्धी स्वरूप असलेले आपले जें आत्मस्वरूप तें आपणच आत्मत्वाने पहावे त्याचे साक्षात्काररूप ज्ञानसंपदन करून घ्यावे

282 अर्जुना ! ते आद्य वस्तु, ते आपले आत्मस्वरूप, जसे बर्फाने बर्फाला गोठवावे तसे आपले आपणच पहावे.

309 अशा वस्तूसाखे दिसतेंपण जें न दिसल्यामुळेच भासमान होते; जें स्वतः अदृश्य राहून विश्वाला प्रकाशित करते

310 जसजसे शिंपीपणाचे ज्ञान मंद होतें, तसतसा रुप्याचा भास खरा वाटूं लागतो किंवा जसजसे दोरीचे ज्ञान लोपतें , तसतसा दोरीवरील सापाचा भ्रम दृढ होतो

343 अशा प्रकारे जेव्हां आत्मज्ञान शरीराने मर्यादित होतें, तेव्हां अल्पणामुळे माझा अंश भासमान होतो.

450 जें अद्वैताला पोचल्यावरच अनुभवता येतें, त्या निर्मळ अनुपाधिक स्वरुपाविषयी प्रश्न करून मला तूं आज परमसुखी केले आहेस

468 निरनिराळी नांवे उच्चारण्यास सांगितली असतां, जशी तरूण स्त्री आपल्या पतीचे नांव येतांच, तें न उच्चारताही केवळ आपल्या लाजण्यानेच ' हे आपल्या पतिराजांचे नांव आहे' असे सुचविते , त्याप्रमाणेच त्या निर्गुण , निरुपाधिक , निराकार आत्म्याचे स्वरूप वाणी केवळ स्तब्धपणानेच दर्शवतें

488 किंवा पाण्यात असलेल्या आकाशतत्त्वावरच जसे आकाशाचे प्रतिबिंब पडते त्याचप्रमाणे अद्वैत चळून द्वैताचा स्वीकार करतें

502 तर अर्जुना ! दुसरा जो अक्षर पुरुष आहे तो यथार्थ ज्ञान व विपरीत ज्ञान यांच्या मध्यभागी आहे. ज्याप्रमाणे मेरु पर्वत मोठ्या पर्वतांच्या मध्यभागी आहे.

542 आता सूर्याचे बिंब व त्याचे पडलेले प्रतिबिंब यांच्या दरम्यान असणारे तेज जरी कोणत्याही उपायांनी घेता आले नाही तरी त्याच्या दरम्यान तेज कोठले असे म्हणु नये.

567 किंवा चोख सोने चोख सोन्यात मिसळे तरच जसे मिश्रणही चोख सोनेच होतें, त्याचप्रमाणे जो मद्रूप होतो, तोच माझी भक्ति करूं शकतो

571 याप्रमाणे पंधराव्या अध्यायात सांगवयास आरंभ केल्यापासून येथपर्यंत हा केवळ सर्व शास्त्रांच्या अभ्यासाने प्राप्त होणारा म्हणजें कळणारा असा उपनिषदरुपी कमळातील गीतारूपी एक सुवासच सर्व जगभर दरवळला आहे

590 त्या संजयाने तेच धृतराष्ट्रराजापुढे प्राशन करण्यासाठी मांडले, म्हणूनच त्या धृतराष्ट्राचा अखेर मरणकाळी परिणाम बरा लागला

591 सामान्यतः गीताश्रवणाच्या वेळी एखादा श्रोता अनधिकारी-अपात्र आहे असे जरी वाटले, तरी अखेरीला ती गीता त्याच्या उपयोगीच पडते

595 शेवंतीच्या फुलाचे रूप पाहिले तर अरसिकांला त्यात विशेष मोहक असे काहीच आढळणार नाही पण भ्रमरासाखे जे रसज्ञ असतात, ते त्याच्या रसाचा आस्वाद जाणतात व मनसोक्त लुटतात.